दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे
✻ (आष्टी) वर्धा ✻ मंगळवार, दि.१८ फेब्रुवारी २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक १३१ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

शेअर बाजाराच्या नावाखाली पाच जणांची ६० लाखांना फसवणूक

ठाणे : शेअर बाजारात जादा परतावा मिळवून देतो अशी बतावणी करून पाच जणांची ६० लाख रुपयांना फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. यातील मुख्य तक्रारदार हा कोलशेत भागात राहतो. नोव्हेंबर २०२४ मध्ये त्याला व्हॉट्स?प क्रमांकावर एक संदेश प्राप्त झाला होता. त्या संदेशामध्ये एक ?पचे लिंक देण्यात आले होते. त्यांनी लिंकवर क्लिक करून ते ?प त्यांच्या मोबाईलमध्ये सामाविष्ठ केले. काही दिवसांनी त्यांना एका व्यक्तीने व्हॉट्स?पवर संदेश पाठवून शेअर बाजारात गुंतवणूक करण्याबाबत माहिती दिली. चांगला परतावा मिळत असल्याने त्यांनी या ?पच्या माध्यमातून गुंतवणूक करण्यास सुरूवात केली. त्यांच्यासोबत त्यांच्या मित्राने देखील यात पैसे गुंतविले.अशाप्रकारे दोघांनी मिळून २१ लाख २० हजार रुपये वेगवेगळ्या बँक खात्यात पाठविले. परंतु परतावा काढताना त्यांना ते ?प बंद असल्याचे समोर आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी याप्रकरणी सरकारच्या एनसीसीआरपी संकेतस्थळावर ऑनलाईन तक्रार दाखल केली. त्यानंतर त्यांना पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. फसवणूक झालेले व्यक्ती, त्यांचा मित्र आणि आणखी तीन जणांची अशाचप्रकारे ऑनलाईन फसवणूक झाली असल्याचे समोर आले. त्यानुसार, वेगवेगळ्या प्रकरणात एकत्रितरित्या कापूरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

देशाच्या विकासात आर्थिक संस्थांचा मोलाचा वाटा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

सन्मित्र महिला नागरी सहकारी बँकेचा रौप्य महोत्सवी सोहळा

वृत्तसंस्था ■ चंद्रपूर



चंद्रपूर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला बळकटी दिली आहे. त्यांनी भारतातील प्रत्येक नागरिकाला बँकिंग क्षेत्रासोबत जोडले आहे. आज भारतातील प्रत्येक नागरिकाचे बँक खाते आहे. त्यामुळे डीजीटल ओळख निर्माण झाली आहे. त्याचा थेट फायदा नागरिकांना मिळत आहे. देशाच्या व सर्वसामान्य नागरिकांच्या विकासात आर्थिक संस्थांचा मोलाचा वाटा असून जेथे आर्थिक संस्था उभ्या राहतात, तेथे विकास भरभरून होतो, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

सन्मित्र महिला नागरी सहकारी बँकेच्या रौप्य महोत्सवी सोहळ्यानिमित्त प्रियदर्शनी इंदिरा सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.

सन्मित्र महिला नागरी सहकारी बँकेने २५ वर्ष यशस्वीपणे पूर्ण केले, असे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, सहकार क्षेत्रात विदर्भातील एक अग्रगण्य बँक म्हणून सन्मित्र महिला नागरी सहकारी बँकेची ओळख आहे. महिलांना अर्थकारण समजते. बचत करणे हा महिलांचा मूळ गुणधर्म आहे. सहकारी बँकेवर नागरिकांचा विश्वास असतो. या बँकेबद्दल सामान्य माणसाला आपुलकी असते. बँकेने सुद्धा दिलेले कर्ज शिस्तीमध्ये परत घेतले पाहिजे. आज ३०० कोटींची उलाढाल असलेल्या सन्मित्र बँकेचा एनपीए ०.५ टक्क्यांच्या खाली आहे, ही अतिशय उत्कृष्ट कामगिरी आहे.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, सहकार क्षेत्रामध्ये महाराष्ट्राने चांगली प्रगती केली आहे. व्यावसायिक बँकांसमोर सहकारी बँकेने आव्हान उभे केले आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात सहकारी बँका टिकतील का, असा प्रश्न उपस्थित होत असताना सन्मित्र सारख्या बँकांनी हे आव्हान चांगल्या पद्धतीने स्वीकारून यशस्वीपणे वाटचाल केली आहे. आज या बँकेने कोर बँकिंग, डिजिटल बँकिंग पद्धती स्वीकारली आहे. सन्मित्र बँकेने ग्राहकांच्या सुरक्षेचे विषय हाती घेतले आहेत. बँकांकडून नागरिकांना कर्ज दिली जातात. त्यामुळे नागरिक स्वतःच्या पायावर उभे राहून व्यवसाय करीत आहे. सन्मित्र बँकेने सुद्धा नागरिकांना कर्ज उपलब्ध करून दिले आहेत. त्यातून त्यांनी रोजगार उभा केला. त्यामुळे अर्थव्यवस्थेची चक्र चालण्यास मदत झाली. या बँकेने पुढील वाटचाल अधिक जोमाने करावी.

संयुक्त राष्ट्र संघटनेने २०२५ हे वर्ष सहकार वर्ष म्हणून जाहीर केले आहे. याच वर्षी सन्मित्र महिला नागरी सहकारी बँकेचा रौप्य महोत्सव होत आहे, ही आनंदाची बाब आहे. भविष्यात आणखी दमदार पाऊल टाकून ५०० कोटी, ७५० कोटी आणि १००० कोटीचा टप्पा बँकेने पार करावा. तसेच इतर सहकारी बँकांसाठी सन्मित्र बँक एक रोलमॉडेल म्हणून उभी राहावी, अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके म्हणाले, सन्मित्र महिला नागरी सहकारी बँकेचा विस्तार सहा-सात जिल्ह्यात झाला असून महिलांना आर्थिक सक्षम करणे, हेच या बँकेचे मुख्य उद्दिष्ट आहे. या जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून बँकेला नेहमीच सहकार्य राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

प्रास्ताविकात संचालिका शोभाताई फडणवीस म्हणाल्या, सन्मित्र महिला नागरी सहकारी बँकेच्या रौप्य महोत्सवाला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहिले, याचा मनापासून आनंद आहे. बँकेची वाटचाल यशस्वीपणे होत असून पुढे जाण्याचा ध्यास आम्ही घेतला आहे. आज सन्मित्र बँकेच्या सर्व शाखांमध्ये एटीएम, डीजीटल बँकींग आदी सोयीसुविधा आहेत. विशेष म्हणजे आमच्या बँकेचा एनपीए कमी आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी बँकेच्या अध्यक्षा डॉ. रजनी हजारे यांनीसुध्दा मनोगत व्यक्त केले.

तत्पुर्वी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'लक्षलक्षिता' या स्मरणिकेचे विमोचन करण्यात आले. तसेच चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला कर्मवीर मा.सां. कन्नमवार यांचे नाव दिल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन कीर्ति चांदे यांनी तर आभार माधवी तांबेकर यांनी मानले.

यावेळी राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, आमदार सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, किशोर जोरगेवार, कीर्तिकुमार भांगडीया, करण देवतळे, देवराव भोंगळे, माजी मंत्री व बँकेच्या संचालिका शोभाताई फडणवीस, अध्यक्षा डॉ. रजनी हजारे, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, मनपा आयुक्त विपीन पालीवाल आदी उपस्थित होते.

साधूग्रामसाठीचे भूसंपादन, रस्ते कामांना गती द्यावी : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



वृत्तसंस्था ■ नाशिक

जिल्हाधिकारी कार्यालयात घेतला कुंभमेळ्याच्या कामांचा आढावा

नाशिक : नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे आगामी काळात होणारा सिंहस्थ कुंभमेळा सुरक्षित होईल, असे नियोजन करावे. भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घेत रस्ते, साधूग्रामच्या भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने सुरू करीत कामांना गती द्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आज सायंकाळी नाशिक महानगरपालिका, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, कुंभमेळा व अन्य अनुषंगिक विषयांबाबत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, आमदार किशोर दराडे, आमदार प्रा. देवयानी फरांदे, आमदार सुहास कांदे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी जलज शर्मा, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. माणिकराव गुरसळ, पोलिस अधीक्षक विक्रम देशमाने, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे, माजी खासदार हेमंत गोडसे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, कुंभमेळ्यासाठीच्या कामांना प्राधान्य देण्यात येईल. त्यानुसार देशभरातून होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेता वाहतुकीचे नियोजन करताना रस्त्यांचा आवश्यक तेथे विस्तार करावा. गोदावरी नदी पात्रात स्वच्छता राहील याची दक्षता घेताना जल प्रदूषण टाळण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. मलःनिस्सारण, जलशुद्धीकरणाचे प्रस्ताव तातडीने राज्य शासनाला सादर करावेत. त्यासाठी आवश्यक निधीच्या तरतुदीसाठी प्रयत्न केले जातील. कुंभमेळा कालावधीत होणारी भाविकांची गर्दी पाहता सीसीटीव्ही, ध्वनिक्षेपक यंत्रणेचे बळकटीकरण करावे. त्यासाठी नाशिक शहर व ग्रामीण पोलिसांनी समन्वयाने नियोजन करावे.

प्रयागराज येथील कुंभमेळ्यातील नियोजनासाठी अधिकाऱ्यांनी पाहणी दौरा करून तेथे केलेल्या उपाययोजनांची माहिती करून घ्यावी. जेणेकरून त्याचा कुंभमेळ्याच्या नियोजनासाठी उपयोग होऊ शकेल. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी रामकालपथ, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मोनोरेलचाही आढावा घेतला.

शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे म्हणाले की, गोदावरी नदी पात्रात दूषित सांडपाणी सोडले जाणार नाही याची दक्षता घ्यावी, असे सांगितले. आयुक्त डॉ. गेडाम यांनी सादरीकरणाद्वारे नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणारा कुंभमेळा शून्य अपघात, सुखद आणि अध्यात्मिक होण्यासाठी तसेच नाशिक शहराला जागतिक पातळीवर आणून अर्थव्यवस्थेस चालना देण्याचा प्रयत्न असल्याचे सांगितले. तसेच कुंभमेळ्यासाठीच्या कामांचा नियमितपणे आढावा घेतला जात आहे. प्रयागराज येथे सुरू असलेल्या कुंभमेळ्याच्या पाहणीसाठी अधिकारी प्रयागराजचा दौरा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार श्रीमती फरांदे यांनीही विविध सूचना केल्या, तर महानगरपालिका आयुक्त श्रीमती खत्री यांनी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या विविध उपाययोजनांची माहिती दिली.

दैनंदिन वापरात इंधन बचत केल्यास शाश्वत विकास शक्य : महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : सौर ऊर्जेचा जास्तीत जास्त वापर करणे, तसेच दैनंदिन वापरात इंधनाची बचत केल्यास भविष्यासाठी ऊर्जा सुरक्षा, शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणाचे उद्दष्टि गाठता येईल, असा विश्वास महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय आणि राज्य शासनाच्या सहकार्याने हरित उर्जेचा वापर करून पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येतात. या अंतर्गत सक्षम २०२४-२५ (संरक्षण क्षमता महोत्सव) १४ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाचे उद्घाटन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंत्री कु.तटकरे बोलत होत्या.

कार्यक्रमास भारत पेट्रोलियम कार्पोरेशनचे बिझनेस हेड राहूल टंडन, हिंदूस्थान पेट्रोलियम कार्पोरेशनचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक देबाशिश बसक, बीपीसीएलचे राज्य प्रमुख राकेश सिन्हा,इंडियन ऑईलचे व्यवस्थापकीय संचालक अभिजीत गिते, जीएआयएल इंडिया लि.चे उपसंचालक मोहम्मद शफी अवान, वरिष्ठ व्यवस्थापक दिपक वाघ, रितेश जाधव यांच्यासह अधिकारी आणि विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते. यावेळी रंगमंच समुहाच्या पथनाट्याद्वारे मुलांना इंधनबचतीचा संदेश देण्यात आला. तसेच इंधन बचतीसाठी यावेळी सामूहिक प्रतिज्ञाही घेण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या महोत्सवास शुभेच्छा दिल्या.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, भारत सरकारने २०२५ पर्यंत इंधनात २० टक्के इथेनॉल मिश्रण अनिवार्य करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. जीवाश्म इंधनाचा वापर कमी करण्यास यामुळे सहाय होणार आहे. नवीकरणीय ऊर्जा सुरक्षितता वाढवणे आणि प्रदूषणमुक्त वातावरण तयार करणे हे आपले उद्दि?ष्ट असले पाहिजे.

घरातही आपण गॅस, वीज वापर, योग्य पद्धतीने केला. इमारतींवर सौर पॅनल वापरले, सिग्नलला वाहन बंद करणे अशा छोट्या छोट्या प्रयत्नातून आपण इंधनाची बचत करू शकतो आणि शाश्वत विकास गाठू शकतो, असे महिला व बालविकास मंत्री तटकरे यांनी सांगितले.

राज्य समन्वयक उमेश कुलकर्णी यांनी सांगितले की, १४ ते २८ फेब्रुवारीपर्यंत तेल विपणन कंपन्या राज्यभरात संवर्धनाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणासाठी मोहीम राबविणार आहे. यामध्ये विद्यार्थी, तरूण, वाहन चालक, क्लिनर, कर्मचारी, शेतकरी, निवासी संस्था, ग्रामपंचायती, स्वयंसेवी संस्था अशा अनेकांपर्यंत पोहोचून इंधन बचतीचे महत्व, फायदे यासंदर्भात जागृती करण्यात येणार आहे. इंधन कार्यक्षम तंत्रज्ञान आणि पद्धतीचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी विविध इंधन संवर्धन उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सायक्लोथॉन, वॉकेथॉन, चित्रकला स्पर्धा, इंधन कार्यक्षम ड्रायव्हिंग स्पर्धा असे विविध उपक्रमांच्या माध्यमातून इंधन बचतीचा संदेश पोहोचविला जाणार आहे.

राज्यपाल, उदय सामंत यांच्या उपस्थितीत 'आम्ही असू अभिजात'चे प्रकाशन

राज्यपाल राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत मराठी साहित्य संमेलन गीताचे राजभवन येथे उदघाटन संपन्न

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : नवी दिल्ली येथे होत असलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त तयार करण्यात आलेल्या संमेलन गीताचे प्रकाशन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते तसेच उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन, मुंबई येथे करण्यात आले.

कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून चित्रित करण्यात आलेल्या या गीतासोबत राज्याचा गौरवशाली इतिहास दाखविण्यात आला आहे.

सन २०२४ या वर्षात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे हे वर्ष मराठी भाषेकरिता अतिशय संस्मरणीय झाले आहे. मराठी भाषेला जागतिक स्तरावर नेण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे, इंग्रजीच्या वाढत्या प्रभावामुळे प्रादेशिक भाषांच्या संवर्धनासाठी सर्वांनाच कसोशीने प्रयत्न करावे लागतील नाहीतर प्रादेशिक भाषा केवळ बोलण्याच्या भाषा राहतील असे राज्यपालांनी सांगितले.

मराठी भाषा ही संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, यांची भाषा असून या भाषेसोबत नैतिक मूल्ये व संस्कार जोडले असल्याचे त्यांनी सांगितले. मराठी ही छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, लोकमान्य टिळक, महर्षी कर्वे, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची देखील भाषा असून त्यांचे समाजासाठी योगदान अनन्यसाधारण आहे, छत्रपती शिवाजी महाराज नसते तर काही पिढ्या गेल्यानंतर आपण आपली संस्कृती विसरून गेलो असतो व इतर संस्कृती अंगिकारली असती. तामिळ भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त करण्यासाठी फार लढावे लागले होते व पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी तामिळ भाषेला अभिजात दर्जा बहाल केला होता असे सांगून मराठी भाषेला अभिजात दर्जा बहाल केल्याबद्दल राज्यपालांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्र शासनाचे आभार मानले. पंतप्रधान स्वतः प्रादेशिक भाषांचा संवर्धनाला प्रोत्साहन देत असून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात देखील मातृभाषेतून शिक्षणाला महत्व देण्यात आले आहे, असे त्यांनी सांगितले.

'आम्ही असू अभिजात' या संमेलन गीताचे गीतकार डॉ. अमोल देवळेकर, संगीतकार आनंदी विकास, गायक मंगेश बोरगावकर, समन्वयक विकास सोनतटे, तसेच आयोजक संस्थेचे सदस्य यावेळी उपस्थित होते. संमेलन गीत ज्येष्ठ गायक हरिहरन, शंकर महादेवन, प्रियंका बर्वे, मंगेश बोरगावकर, शमीमा अख्तर आदींनी गेले असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

अधिकाधिक मुलींना उच्च शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी महिला विद्यापीठाने शाळांशी संपर्क वाढवावा : राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन

वृत्तसंस्था ■ मुंबई





मुंबई : स्थापनेचे १०९ वे वर्ष साजरे करीत असलेल्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाने अधिकाधिक मुलींना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी राज्यातील, विशेषतः ग्रामीण व आदिवासी भागातील, शाळांशी संपर्क वाढवावा, असे आवाहन राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती सी.पी. राधाकृष्णन यांनी आज येथे केले.

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत महिला विद्यापीठाचा ७४ वा दीक्षांत समारोह विद्यापीठाच्या पाटकर सभागृहात सोमवारी (दि. १७) संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.

महिला विद्यापीठाने नुकतेच चंद्रपूर येथे उपकेंद्र सुरू केले असल्याचे नमूद करून विद्यापीठाने आदिवासी भागातील मुलींची उच्च शिक्षणातून होणारी गळती कमी करण्याच्या दृष्टिने या संपूर्ण समस्येचे अध्ययन करावे, अशी सूचना राज्यपालांनी यावेळी केली. विद्यापीठाने पारंपरिक अभ्यासक्रमांशिवाय विद्यार्थिनींना कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, आरोग्य सेवा व्यवस्थापन आदी क्षेत्रातील आधुनिक पदवी अभ्यासक्रम उपलब्ध करुन द्यावे, असेही यावेळी राज्यपाल यांनी सांगितले.

पदवीधर विद्यार्थिनींनी जीवनात यशस्वी होण्यासाठी आपले उद्दिष्ट निश्चित करावे त्या दृष्टीने कठोर परिश्रम करावे, प्रत्येकाला निसर्गाने वेगवेगळी कौशल्ये, क्षमता दिल्या असल्यामुळे कोणीही इतरांशी तुलना करीत बसू नये व आपल्या गतीने आपले निर्धारित उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करावे. स्वतःसाठी जगणे चुकीचे नाही, परंतु केवळ स्वतःसाठी जगणे चुकीचे आहे असे सांगून विद्यार्थ्यांनी आयएएस, आयपीएस किंवा इतर परीक्षा उत्तीर्ण कराव्या. मात्र समाजातील अशिक्षित तसेच गोरगरीब महिलांची काळजी घ्यावी. विद्यापीठांनी आपले शैक्षणिक वेळापत्रक पुरेसे अगोदर तयार करुन जाहीर करावे, तसेच सर्व परीक्षांच्या व दीक्षांत समारोहाच्या तारखा अगोदरच जाहीर कराव्या, असे राज्यपालांनी सांगितलेङ

समाज एका महिलेला सुशिक्षित करतो त्यावेळी तिच्या सर्व भावी पिढ्यांना सुशिक्षित करीत असतो, असे सांगताना यशस्वी महिलांनी आपला काही वेळ समाजातील उपेक्षित महिलांच्या कल्याणासाठी द्यावा तसेच आत्मसन्मानाशी कधीही तडजोड करू नये असे उद्गार एकात्मिक संशोधन आणि विकास कृतीच्या कार्यकारी संचालिका डॉ. ज्योती पारिख यांनी यावेळी काढले.

कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव यांनी आपल्या अहवालात नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, विदेशी विद्यापीठांशी सहकार्य, हवामान बदल या विषयावर आधारित आंतरराष्ट्रीय परिसंवाद, विद्यापीठाने क्रीडा तसेच इतर क्षेत्रात केलेल्या कामगिरीची माहिती दिली.

दीक्षांत समारोहाला डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, माजी कुलगुरू डॉ. चंद्रा कृष्णमूर्ती, विद्यापीठाच्या प्रकुलगुरु डॉ. रूबी ओझा, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा आणि मूल्यांकन मंडळाचे संचालक, अधिष्ठाता आणि विभाग प्रमुख, शैक्षणिक आणि अशैक्षणिक कर्मचारी, तसेच स्नातक उपस्थित होते.

दीक्षांत समारोहात १५,३९२ विद्यार्थ्यांना पदवी व पदविका प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. एकूण ४६ संशोधकांना पीएचडी तर ७७ स्नातकांना सुवर्णपदके प्रदान करण्यात आली.

कल्याणमध्ये तीन महिन्याच्या बालकाला पालकांनी बेवारस स्थितीत सोडले

वृत्तसंस्था ■ कल्याण

कल्याण : कल्याण पश्चिमेतील जोशीबाग भागात एका घराच्या समोर मोकळ्या जागेत एक तीन वर्षाच्या बालकाला त्याच्या आई, वडिलांनी शनिवारी सकाळी बेवारस स्थितीत सोडून दिले आहे. हे बालक एकटेच रस्त्यावर रडत असल्याने एका सामाजिक कार्यकर्ता महिलेने याप्रकरणाची महात्मा फुले पोलीस ठाण्यात तक्रार केल्यानंतर पोलिसांनी बालकाला बेवारस स्थितीत सोडून देणाऱ्या अनोळखी व्यक्तिंविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

कल्याण पश्चिमेतील जोशी बागेतील परवेज अल्ली सय्यद यांच्या घरासमोर, सय्यद पॅलेस, न्यू हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय येथे शनिवारी सकाळी साडे नऊ वाजण्याच्या दरम्यान रस्त्यावर एक तीन वर्षाचे बालक बेवारस स्थितीत असून ते रडत असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्त्या निलीमा मंगेश सोनवणे यांना मिळाली. परिसरातील रहिवासी, पादचारी नागरिक या बालकाभोवती जमा झाले. या बाळाला याठिकाणी कोणी सोडून दिले याचा शोध घेण्यात आला. पण परिसरात कोणीही आढळून आले नाही. याप्रकरणाची माहिती मिळाल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर साबळे, साहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद पाटील, महिला पोलीस उपनिरीक्षक घाटगे, प्रतिभा माळी यांनी घटनास्थळी भेट दिली. सदर मुलाचा ताबा घेण्यात आला. शासकीय बाल संरक्षण व सुधार गृहात या बालकाला ठेवण्याची व्यवस्था केली जाणार असल्याचे समजते. या मुलाला जोशी भागातील रस्त्यावर कोणी आणून सोडले याचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे.

संपादकीय...

गणंग गेला आणि...

पक्षाची इभ्रत, आपला मान हा एखाद्या प्रांतातील- तोही सीमावर्ती- नागरिकांच्या मूलभूत हक्कांपेक्षा अधिक महत्त्वाचा असावा?एरवी राष्ट्रवाद, राष्ट्रप्रेम, राष्ट्रनिष्ठा इत्यादी मुद्दयांवर तावातावाने उपदेश देण्याची एकही संधी न सोडणाऱ्यांस मणिपुरातील आग दिसू नये?'ठंडा करके खाओ' ही खरी काँग्रेसी कार्यशैली. ती स्वतःच्या अंगी बाणवून घेण्यात भाजप किती कमालीचा यशस्वी ठरला याचे मूर्तिमंत उदाहरण मणिपूर येथील घडामोडींमध्ये पाहावयास मिळेल. हे राज्य जवळपास गेली दोन वर्षे जळते आहे आणि त्यास त्या राज्याचे नतद्रष्ट मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह हेच कारणीभूत आहेत. त्यामुळे त्यांना हटवा ही मागणी विरोधकच काय पण भाजपचे सहयोगी पक्ष तसेच खुद्द भाजपवासीही करत होते. ते योग्यच. पण तरीही भाजपच्या श्रेष्ठींनी बिरेन सिंहविरोधी मागण्यांकडे ढुंकूनही पाहिले नाही. त्या राज्यातील परिस्थिती इतकी चिघळली की मुख्यमंत्र्यांच्या तसेच अन्य मंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी हल्ला करण्याइतकी जमावाची भीड चेपली. त्याआधी चक्क लष्करावर हल्ले झाले, पोलीस शस्त्रागार लुटले गेले आणि विविध हिंसक घटनांत जवळपास २०० जणांचे प्राण गेले. तरीही भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाची मुख्यमंत्र्यांवरची माया काही कमी व्हायला तयार नव्हती. हा सत्ताधारी भाजपकडून 'शिकण्यासारखा' गुण. विरोधकांची मागणी कितीही रास्त असो वा त्यांच्या आरोपांत कितीही तथ्य असो! त्याकडे सरळ डोळेझाक करायची. अखेर विरोधक थकतात, कंटाळतात आणि आपुलकीची माध्यमे सदर विषयांस महत्त्व देईनाशी होतात. थोडक्यात असे केल्याने वादाचा मुद्दा विस्मरणात जातो आणि सुखेनैव राज्य करता येते. विद्यामान सत्ताधीशांचे पूर्वसुरी मनमोहन सिंग यांची कार्यशैली बरोबर याच्या उलट. विरोधकांनी आरोप लावून धरल्यास सिंग त्या प्रकरणी चौकशी जाहीर करत. मग विरोधकांस अधिकच चेव येत असे. याउलट विद्यामान राज्यकर्ते. ते आपल्यावरील आरोपांकडे पाहतसुद्धा नाहीत. चौकशी करणे राहिले दूर. तरीही आपल्या एका मुख्यमंत्र्यांस पायउतार करण्याची वेळ भाजपवर आली. विरोधकांस कधीच भीक न घालणाऱ्या भाजपने हे असे का केले असावे?'जीव जाईल तेव्हाच या शांत होतील' महिलांनी अक्षरशः हद्द पार केली; भयंकर ह्रद्यिं पाहून विरार लोकलमध्ये चढताना १०० वेळा विचार कराल आजपासून सुरू होणारे मणिपूर विधानसभेचे अधिवेशन आणि त्यात विरोधकांकडून येऊ घातलेल्या अविश्वास ठरावास स्वपक्षीय आमदारांकडून साथ मिळण्याची स्पष्ट शक्यता ही यामागील दोन कारणे. या विधानसभा अधिवेशनात बिरेन सिंह यांच्याविरोधात अविश्वास ठराव मांडण्याची सूचना काँग्रेसजनांनी दिलेली होती. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने विधानसभाध्यक्षांकडे याबाबत चाचपणी करून पाहिली असता त्यांनी हा ठराव थांबवता येणार नाही, असे स्पष्ट केले. याचे कारण विधानसभाध्यक्षच मुख्यमंत्री सिंह यांच्या विरोधात गेलेले आहेत. म्हणजे हा ठराव आला असता तर सभाध्यक्षांनी तो थांबवला नसता आणि भाजपच्याच आमदारांनी त्याच्या बाजूने मतदान केले असते. आमदारांनी भाजप नेतृत्वास याची स्पष्ट जाणीव करून दिली होती. हे आमदार गेले २१ महिने सिंह यांच्याविरोधात श्रेष्ठींकडे दाद मागत आहेत. पण भाजप नेतृत्वाने विरोधकांना दाखवली तशी आपल्याच पक्षाच्या आमदारांच्या मुख्यमंत्री हटाव मागणीसही केराची टोपलीच दाखवली. तेही एकदा नव्हे, तर अनेकदा. अखेर शिस्तबद्ध अशा भाजपच्या आमदारांनीच सिंह हटाव मागणीवर विरोधकांशी हातमिळवणी करण्याचा उघड इशारा दिला. याचा अर्थ स्पष्ट होता. विधानसभेत अविश्वास ठराव मंजूर होऊन बिरेन सिंह सरकार पडले असते. तसे होऊन स्वहस्ते आपलेच नाक कापले जाण्याचा धोका भाजप नेतृत्वास स्पष्ट दिसला आणि अखेर श्रेष्ठींनी बिरेन सिंह यांच्या हाती नारळ दिला. म्हणजे मणिपुरी जनतेच्या भावनांची कदर, त्या राज्यात शांतता निर्माण होऊन तेथील जनतेचा विकास व्हावा वगैरे मुद्द्यांसाठी नव्हे तर आपले सरकार गडगडताना पाहण्याची नामुष्की टळावी या आणि याच हेतूने मणिपुरी मुख्यमंत्र्यांस घरचा रस्ता दाखवला गेला. जी गोष्ट साधारण २२-२३ महिन्यांपूर्वी व्हायला हवी होती; ती आता झाली. या विलंबामुळे सिंह यांस भले निर्लज्ज अभय मिळाले असेल. पण यामुळे भयग्रस्त मणिपुराचे काय झाले असेल?हा प्रश्न सत्ताधीशांस पडला नाही, ही यातील खरी दुःखाची बाब. एरवी राष्ट्रवाद, राष्ट्रप्रेम, राष्ट्रनिष्ठा इत्यादी मुद्दयांवर तावातावाने उपदेश देण्याची एकही संधी न सोडणाऱ्यांस मणिपुरातील आग दिसू नये? पक्षाची इभ्रत, आपला मान हा एखाद्या प्रांतातील- तोही सीमावर्ती- नागरिकांच्या मूलभूत हक्कांपेक्षा अधिक महत्त्वाचा असावा? आपला मुख्यमंत्री सर्वांस बरोबर घेऊन जाण्याची पदसिद्ध जबाबदारी पार पाडण्याऐवजी दोन समाजांतील दरी अधिकच वाढवत आहे याची जाणीव सत्ताधीशांस होऊ नये? मणिपूर हे कुकी आणि मैतेई या दोन अनुक्रमे ख्रिाश्चन आणि हिंदू समाजगटांत विभागलेले आहे. हे बिरेन सिंह मैतेई. त्यामुळे त्यांनी खुशाल कुकींचे हत्याकांड होऊ दिले असा विरोधकांचा आरोप. तो असत्य ठरवणे अवघड असे त्या राज्याचे वास्तव. या दोन समाजांच्या दंगलखोरांनी सरकारी शस्त्रागार लुटले आणि प्रसंगी लष्करावरही हल्ला करण्यापर्यंत त्यांची मजल गेली. हे असले भीषण कृत्य भाजपेतर पक्षांच्या राज्यात घडले असते तर राष्ट्रवादी भाजपने देश डोक्यावर घेतला असता. पण मणिपुरातील परिस्थितीने केंद्रीय नेतृत्वाचे मन काही द्रवले नाही. परिस्थिती खरे तर इतकी गंभीर झाली की सत्ताधाऱ्यांच्या विचारकुलाचे प्रमुख सरसंघचालक मोहनराव भागवत यांसही मणिपुरात शांतता प्रस्थापित करण्याची गरज जाहीरपणे व्यक्त करावी असे वाटले. सरकारने त्याकडेही दुर्लक्ष केले. भारतीयांची सुखरूप सुटका व्हावी यासाठी खरे तर दूरवरील युक्रेन आणि रशिया यांच्यातील युद्ध थांबवण्याची क्षमता असलेल्यांस भारताचाच भाग असलेल्या मणिपुरातील यादवी थांबवणे अवघड नव्हते. पण तरीही त्यासाठी प्रयत्न झाले नाहीत आणि मणिपुरींच्या वाहत्या जखमांवर फुंकर घालण्यासाठी देशाचे शीर्षस्थ नेतृत्व काही मणिपुरात फिरकले नाही. नुकतेच संसदेसमोर राष्ट्रपतींचे अभिभाषण पार पडले. देशातील अनेक महत्त्वाच्या मुद्दयावर भाष्य करणाऱ्या महामहिमांच्या भाषणात मणिपुरात शांतता निर्मितीसाठी सरकार उचलत असलेल्या पावलांचा उल्लेख त्या राज्यास निदान आपली दखल तरी घेतली जाते याचे समाधान देणारा ठरला असता. पण इतका साधा आनंदही त्या राज्यातील नागरिकांस विद्यामान सरकारने दिला नाही. अखेर स्वपक्षीयच हाताबाहेर जात असल्याची जाणीव झाल्यावर मात्र सिंह यांस सोडचिठ्ठी दिली गेली. इतका अकार्यक्षम नेता पदावरून पायउतार झाल्याचे अजिबात दुःख नाही.पण आता तरी कुकी आणि मैतेई यांच्यातील दरी सांधण्यासाठी सरकार प्रामाणिक प्रयत्न करणार का, हा प्रश्न. तो किती गंभीर आहे हे 'लोकसत्ता'ने किमान अर्धा डझन संपादकीयांतून दाखवून दिले आहे. 'मुख्यमंत्र्यांना हाकलाच' (३१ मे '२३), 'नागडे कोण? (२१ जुलै '२३), 'सरसंघचालकांचे तरी ऐका! (१० सप्टेंबर '२४), 'मणिपुरेंगे' (१८ नोव्हेंबर '२४) ही चार त्यातील अलीकडची. या संपादकीयांतून त्या राज्यातील अन्यायकारक 'आर्म्ड फोर्सेस स्पेशल प्रोटेक्शन ॲक्ट' (अफ्सा) कायदा मागे घेण्याची गरज अधोरेखित केली गेली होती. सामान्य नागरिकांचे जगणे कमालीचे अवघड करणारा हा कायदा जोपर्यंत मागे घेतला जात नाही, तोपर्यंत बिरेन सिंह यांच्यासारख्यांची गच्छंती पुरेशी नाही. समाजातील दुजाभाव कमी करणे, सर्वांशी सौहार्दाने वागेल असा मुख्यमंत्री निवडणे आणि त्या जोडीने 'अफ्सा' कायदा मागे घेत नागरिकांस त्यांचे लोकशाही हक्क बहाल करणे हेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे. बदल आणि सुधारणा मूलभूत हवी. नपेक्षा गणंगाच्या जागी कोणी गणप्या यायचा आणि मणिपूर धुमसतच राहायचे.

।।। रामकृष्ण मिशनः विचार व धर्मकार्य ।।।

(१८ फेब्रुवारीः सद्गुरु रामकृष्ण परमहंस जयंती उत्सव विशेष)



प्रस्तुत लेख हा सद्गुरुदेव रामकृष्ण परमहंस यांच्या आध्यात्मिक, तांत्रिक, वैष्णव, आणि भक्तिमय जीवनाचा परिचय करून देतो. रामकृष्ण परमहंस यांनी त्यांच्या पूर्ण जीवनात भक्ती, ज्ञान आणि धर्म प्रसार केला. सद्गुरुदेव रामकृष्णजींचा सर्व धर्मीयांसाठी उपदेश- 'जतो मत, ततो पथ- जितकी मते, तितके पंथ' हा उपदेश सहिष्णुतेचे प्रतीक आहे. परमहंसांचे पुढील उद्गार प्रसिद्ध आहे- 'माझा धर्म बरोबर, दुसऱ्यांचा धर्म चूक, हे मत योग्य नाही. ईश्वर एकच आहे, त्याला वेगवेगळे लोक भिन्न भिन्न नावाने पुकारतात. कोणी म्हणती गॉड, कोणी अल्ला, कोणी म्हणती कृष्ण, कोणी म्हणती शिव, कोणी म्हणती ब्रह्म. तळ्यात पाणी असते परंतु कोणी त्याला पाणी म्हणतो, कोणी वॉटर तर कोणी जल. हिंदू त्याला जल म्हणतात, ख्रिश्चन वॉटर, मुसलमान पानी म्हणतात, पण वस्तू एकच असते. एकेका धर्माचे एकेक मत असते, एकेक पथ असतो, परमेश्वराकडे घेऊन जाण्यासाठी. जशी नदी नाना दिशांहून येऊन एकाच सागरात विलीन होते.' ही उद्बोधक माहिती अवश्यच वाचा, बापू- श्रीकृष्णदास निरंकारीजींच्या शब्दात... संपादक.

रामकृष्ण परमहंस- पूर्वाश्रमीचे नाव गदाधर चट्टोपाध्याय हे एकोणिसाव्या शतकातील भारतात बंगालमध्ये होऊन गेलेले जगद्विख्यात गूढवादी सत्पुरुष होते. स्वामी विवेकानंद हे रामकृष्ण परमहंसांचे प्रमुख शिष्य होते. आधुनिक भारतीय धर्मप्रबोधनात त्यांनी कामगिरी बजावली. ते त्यांच्या शिष्यांमध्ये ईश्वराचे अवतार मानले जातात. ते ग्रामीण बंगालमधील एका गरीब वैष्णव ब्राह्मण परिवारात जन्मले. कोलकात्याच्या दक्षिणेश्वर काली मंदिरात त्यांनी काही काळ पौरोहित्य केले. त्यानंतर शाक्तपंथीयांच्या प्रभावाने काली आराधना सुरू केली. त्यांच्या आरंभीच्या काही प्रसिद्ध आध्यात्मिक गुरूंमध्ये भैरवी ब्राह्मणी या साध्वीचा समावेश होतो. तंत्र व वैष्णव भक्तीमध्ये भैरवीला गती होती. नंतर परमहंसांच्या म्हणण्यानुसार एका अद्वैत वेदान्तीच्या मार्गदर्शनाखाली त्यांना निर्विकल्प समाधी अनुभवता आली. त्यांनी इतर धर्मांबाबतही, विशेषतः इस्लाम व ख्रिश्चन धर्माबाबत प्रयोग केले आणि हे सर्व धर्म एकाच ईश्वराकडे घेऊन जातात, असे म्हटले. ग्रामीण बंगाली भाषेतील छोट्या छोट्या कथांचा तेथील जनतेवर बराच प्रभाव पडला. त्यामुळे रूढार्थाने अशिक्षित असतानाही रामकृष्ण परमहंस हे बंगाली विद्वज्जन समाजाचे व शिक्षित मध्यमवर्गाचे लक्ष वेधण्यास यशस्वी ठरले. सन १८७०च्या दशकाच्या मध्यापासून पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या बुद्धिजीवींवर त्यांचा प्रभाव पडला व नंतर ते बंगालमधील हिंदू प्रबोधनाचे उद्गाते ठरले. सद्गुरुदेव रामकृष्णजींचा सर्व धर्मीयांसाठी उपदेश- 'जतो मत, ततो पथ- जितकी मते, तितके पंथ' हा उपदेश सहिष्णुतेचे प्रतीक आहे. परमहंसांचे पुढील उद्गार प्रसिद्ध आहे- 'माझा धर्म बरोबर, दुसऱ्यांचा धर्म चूक, हे मत योग्य नाही. ईश्वर एकच आहे, त्याला वेगवेगळे लोक भिन्न भिन्न नावाने पुकारतात. कोणी म्हणती गॉड, कोणी अल्ला, कोणी म्हणती कृष्ण, कोणी म्हणती शिव, कोणी म्हणती ब्रह्म. तळ्यात पाणी असते परंतु कोणी त्याला पाणी म्हणतो, कोणी वॉटर तर कोणी जल. हिंदू त्याला जल म्हणतात, ख्रिश्चन वॉटर, मुसलमान पानी म्हणतात, पण वस्तू एकच असते. एकेका धर्माचे एकेक मत असते, एकेक पथ असतो, परमेश्वराकडे घेऊन जाण्यासाठी. जशी नदी नाना दिशांहून येऊन एकाच सागरात विलीन होते.' ही उद्बोधक माहिती अवश्यच वाचा, बापू- श्रीकृष्णदास निरंकारीजींच्या शब्दात... संपादक.



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

रामकृष्ण परमहंस यांचे खरे नाव गदाधर चट्टोपाध्याय होते. त्यांचा जन्म दि.१८ फेब्रुवारी १८३६ रोजी कामारपुकुर, पश्चिम बंगाल येथे एका गरीब वैष्णव ब्राह्मण कुटुंबात झाला. ते एकोणिसाव्या शतकातील एक गूढवादी आध्यात्मिक सत्पुरुष आणि सद्गुरु होते. ते खऱ्या अर्थाने जगविख्यात बनले, ते म्हणजे स्वामी विवेकानंद यांचे गुरू म्हणून! परमहंसदेव यांना त्यांचे सर्व शिष्य आणि आप्तेष्ट हे ईश्वरी अवतार मानत असत. सुरुवातीच्या जीवनात रामकृष्ण हे काली भक्त म्हणून प्रसिद्ध होते. भक्ती आणि गूढता यांत ते पारंगत होतेच, परंतु ती केवळ भावना होती. त्यांना देवी काली खरोखर दर्शन देत असे. ऊर्जा आणि भावना यांचा खऱ्या अर्थाने जम बसवण्यात ते कुशल बनले होते. तंत्र आणि वैष्णव भक्ती यांत त्यांना परमानंद जाणवत होता. परंतु एक दिवस तोताराम या सत्य जाणणाऱ्या महापुरुषाने त्यांना सत्य आणि कल्पना यातील फरक समजावून दिला. त्या दिवसानंतर रामकृष्ण खऱ्या अर्थाने धार्मिक आणि आध्यात्मिक अनुभवाला प्राप्त झाले. रामकृष्णजी हे अशिक्षित असल्याने त्यांची बोलीभाषा ग्रामीण होती; परंतु आध्यात्मिक अनुभवामुळे त्यांची वाणी सुमधुर आणि रसाळ होती. त्यांच्या कथांचा आणि व्याख्यानाचा बंगाली जनतेवर विलक्षण प्रभाव दिसून येत होता. अनेक तार्किक आणि बौद्धिक लोकांना देखील ज्ञान देण्यात ते यशस्वी ठरले. गदाधर चटोपाध्याय- रामकृष्ण परमहंसजी यांच्या वडिलांचे नाव क्षुदिराम चट्टोपाध्याय, काही ठिकाणी खुदीराम, असा उल्लेख आहे तर आईचे नाव चंद्रमणीदेवी असे होते. सद्गुरु रामकृष्णजींना लहानपणी सर्वजण गदाधर या नावाने ओळखत. शिक्षणात आणि तार्किक कौशल्यात त्यांना विशेष रस नव्हता. मातीच्या मूर्ती बनवणे, संगीत आणि कथा सांगणे यामध्ये त्यांचे विशेष प्राविण्य होते. सत्पुरुष आणि संन्यासी यांच्याकडून ते लहानपणी कथा ऐकत असत तथा कथा सांगतही असत. पुरीच्या मार्गावर असताना त्यांच्या कामारपुकुर गावात जर कोणी संन्यासी, विद्वान ब्राह्मण विसाव्यासाठी थांबले तर ते त्यांची सेवा करत असत. त्यांचा तर्कशास्त्र व धार्मिक संवाद जाणून घेत असत. वडिलांच्या निधनानंतर रामकृष्णजींचे थोरले बंधू रामकुमार यांनी कुटुंबाची जबाबदारी स्वीकारली. रामकृष्णजी हे आईच्या सानिध्यात राहू लागले. घरातील कामे, देवपूजा आणि आईची सेवा करू लागले. त्यानंतर काही काळाने रामकुमार हे कोलकात्यात पुरोहित बनले. भावाच्या सहाय्यतेसाठी रामकृष्णजी सन १८५२मध्ये कोलकात्याला गेले. कोलकात्यात अस्पृश्य कैवर्त समाजातील एका जमीनदार घराण्यातील राणी रासमणीने दक्षिणेश्वर मंदिराची प्रतिष्ठापना केली. रामकुमार त्या मंदिरात प्रमुख पुजारी बनले. त्यांची मदत म्हणून रामकृष्णजींनी मूर्तीच्या साजसज्जेचे दायित्व स्वीकारले. सन १८५६ साली रामकुमार यांच्या मृत्यूनंतर रामकृष्णजींनी त्यांची जागा चालवली. त्यानंतर मंदिरातच ते राहू लागले. रामकृष्णांच्या अतिभाव तन्मयतेमुळे सर्व लोक त्यांना वेडे समजू लागले. त्यांचा विवाह लावून द्यावा, अशी त्यांच्या आईची इच्छा होती. गुरुदेव रामकृष्ण परमहंस यांनी विवाहाला विरोध केला नाही. कामारपुकुर गावाजवळील जयरामवाटी गावच्या रामचंद्र मुखोपाध्याय यांची मुलगी शारदादेवी यांच्याशी त्यांचा विवाह करण्यात आला.

सन १८६१ साली भैरवी ब्राह्मणी यांच्याशी रामकृष्णजींची भेट झाली. भावनिक व अध्यात्मिक शक्तीमुळे त्यांचे शरीर आणि मन असह्य वेदना सहन करत होते. त्या वेदनेचा अंत करण्यासाठी भैरवी ब्राह्मणी यांनी त्यांना तंत्रसाधना करण्यास सांगितले. त्या साधनेमुळे ते बरे होत गेले. तंत्र व मंत्र साधना पूर्ण करण्यासाठी त्यांना दोन वर्षे एवढा कालावधी लागला. रामकृष्णजी हे भैरवी ब्राह्मणी यांस मातृभावनेने पुजत असत. तर भैरवी हे रामकृष्णजींना अवतार मानत असत. भैरवी यांनी त्यानंतर कुमारी पूजेची दीक्षा दिली, ज्यात कुमारिकेला देवी समजून तिची पूजा केली जाते. गुरुवर्य रामकृष्ण हे कमालीचे भावतन्मय व्यक्ती होते. कालीपूजा, रामभक्ती, कृष्णभक्ती या सर्व देवतांच्या पुजेमध्ये त्यांनी दास्यपद स्वीकारले होते. देवी कालीला ते विश्वजननी, स्वतःची आई मानत असत. त्यांनी रामभक्ती करताना स्वतःला हनुमान आणि कृष्णभक्तीवेळी स्वतःला राधा मानून भक्ती केली. त्यांची भावना एवढी प्रबळ होती, की ऊर्जेच्या स्वरूपात त्यांच्यापुढे सर्व काही प्रकट होत असे. देवी कालीचे दर्शन, वैष्णवभक्ती, कृष्ण व रामभक्ती या सर्वांमध्ये निर्माण झालेली तल्लीनता, हे सर्वकाही त्यामुळेच घडत होते. सन १८६४ साली तोतापुरी या वेदान्तिक संन्याशाकडून त्यांनी संन्यास घेतला. तोतापुरी हे आध्यात्मिक उन्नती साधलेले सिद्ध पुरुष होते. त्यांनी त्यांना अद्वैत तत्त्वज्ञान शिकवले. तोतापुरी यांच्याच मार्गदर्शनाखाली त्यांनी निर्विकल्प समाधीज्ञान आणि अनुभव प्राप्त केला.

परमगुरु रामकृष्णजींना इस्लाम व ख्रिश्चन धर्मांबद्दल देखील कमालीचा आदर होता. सर्व धर्म समभाव त्यांच्या अंगी होता. जगातील सगळे धर्म म्हणजे नद्याच आहेत; ज्या शेवटी सागरास म्हणजे अद्वैत शक्तीस मिळतात, असा त्यांचा समज होता. सद्गुरु रामकृष्ण परमहंसांनी दि.१६ ऑगस्ट १८८६ रोजी महासमाधी घेतली. त्यांनंतर त्यांचे परमशिष्य स्वामी विवेकानंदजी यांनी रामकृष्ण मिशन या संस्थेद्वारे त्यांचे धर्मकार्य सुरू ठेवले. रामकृष्णजी यांचे विचार आणि कार्य पुढे नेण्याचे काम ही संस्था आजही करत आहे.

!! पावन जयंतीनिमित्त त्यांना व त्यांच्या जनकल्याणी कार्यास विनम्र अभिवादन !!

क्लोजर रिपोर्ट...

तपासयंत्रणा
तत्परते
विश्वासठेवतात खुळे
पेटी बंद रहस्ये सारी
मारून टाकले खिळे

कुजलेले
व्यवस्थापन
ती दुर्गंधीसर्वत्र
दर्वळे
आश्वासने तुंडुंब मिळे
आशा दाखवी दरवेळे

थातूरमातूर अटक ती
चोरपुलिस खेळ खेळे
आधीचं जामीन घेता
रे मारून न्यायचे वेळे

जेरबंद चारपाच जण
आरोप दाखल दुर्बळे
शृंखलाबध्द करुनिया
खात्यास बनवी दुबळे

नोंदी करी अधिकारी
केले काम हातावेगळे
बंदकरून केसेस सर्व
मोकळे झाले रे सगळे

क्लोजर रिपोर्ट सादर
झाले ते नामा निराळे
चोळून हळू हळू डोळे
रे शांत होतील धुराळे

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६..

अतिक्रमण...

गड
किल्ल्यांजवळ
मातले अति क्रमण
अमूल्य ठेव्याबाबत
नाआणे राजकारण

वचक बसावा भला
कडक हवे ते धोरण
सक्तहव्या कारवाया
नको ते दात कोरण

अमोलअद्भुतवारसा
पिढ्यांनादेई स्फुरण
ऐतिहासिक दाखले
भविष्यांचे अनुसरण

फक्त न भग्नअवशेष
ससादर मूक विवरण
हस्तक्षेम हिंसक असे
विदार्ण होअंतःकरण

जनप्रबोधन जरुरीचे
त्वरे थांबवअधिगृहण
वेळीच थोपव कुवृत्ती
संस्कृतीस लाग ग्रहण

इतिहासघडवेभविष्य
हवी कृतज्ञता स्मरण
महापुरुषांचीआठवण
भवितव्याची उध्दरण

चाणाक्षा साक्षात्कार
महा विभूतींचे चरण
आत्मघात टाळू पहा
सदाचाराचे आचरण

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

दोन अब्जाधिशांनी गोरगरिबांच्या कल्याणासाठी 'अब्जावधी रुपयांचा' मोह त्याग करून केले दान

अनिल मोरे



आजच्या युगामध्ये माणसाला प्रचंड परिश्रम करून आपले स्वप्न साकारता येणे कठीण असते.व त्यासाठी तो व्यक्ती एक - एक रुपयाची बचत करण्यात व्यस्त असतो. तसेच माणसांच्या स्वप्नांची भूक मोठी असल्याने तो माणूस अनेक चांगल्या वाईट मार्गांनी पैसा कमवण्यामध्ये व्यस्त असतो. तर दुसरीकडे श्रीमंत अब्जाधीशांनी संपूर्ण आयुष्यभर बुद्धिजीवी मार्गाने मिळवलेले अब्जावधी रुपये निस्वार्थ भावनेने गोरगरीब गरजू लोकांसाठी ते दान करत आहेत...

तसेच जगातला तीन नंबरचा श्रीमंत अब्जाधीश व्यक्ती वॉरन बफे यांनी गोरगरीब गरजू लोकांसाठी प्रचंड मोठी रक्कम दान केली आहे.तर मलेशियातील उद्योगपती अब्जाधीश आनंद कृष्णन यांच्या मुलाने ४० हजार कोटी रुपयांची संपत्तीमध्ये कोणताही मोह न ठेवता बौद्ध सन्याशी होण्याचा धाडसी निर्णय घेऊन तो संन्याशी जीवन जगत आहे.

मृत्यू केव्हाही येऊ शकतो

अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राचा अतिश्रीमंत अब्जाधीश वॉरन बफे (९४ वर्ष) यांनी म्हटले आहे की, मनुष्य येताना काही घेऊन येत नाही.आणि जाताना सुद्धा काहीही घेऊन जात नाही.मंग तो कितीही श्रीमंत अब्जाधीश असला तरी मृत्यू,हे जगातले त्रिवार सत्य,नाकारता येत नाही.त्यामुळे मृत्यू, केव्हाही येऊ शकतो असे अब्जाधीश वॉरन बफे यांना वाटत आहे. सध्याच्या वास्तव परिस्थितीमध्ये ते असे म्हणतात, मी जिवंत असताना माझी संपत्ती वाटू इच्छितो. या दरम्यान त्यांनी स्वतःच्या कर्तुत्वावर मिळवली संपत्ती १.१अब्ज डॉलर वेगवेगळ्या संस्थांना दान केले आहेत.

वॉरन बफे पहिल्या अतिप्रिय पत्नीच्या आठवनी मध्ये

वॉरन बफे यांना त्यांची अतिप्रिय पहिली पत्नी सुइसची आठवणी मध्ये म्हणत होती की, मला असे वाटत होतं की, ती माझ्या मृत्यूनंतर राहील आणि माझ्या सर्व संपत्तीचे वितरण व्यवस्थित करील. पण सध्या तशी परिस्थिती राहिलेली नाही.

कुटुंबाच्या फाउंडेशनला संपत्ती

वॉरन बफे सुमारे १५० अब्ज डॉलरचे मालक आहेत. आज पर्यंत संपत्तीचा बराच भाग त्यांनी सामाजिक कार्यासाठी दान करत राहिले आहेत. आपली संपत्ती दान करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय त्यांनी घेतला होता. या धाडसी निर्णयानंतर बर्कशायरमध्ये आपल्या वाट्याला आलेला ७५ टक्के भाग दान केला आहे. ९९.५ टक्के संपत्तीची विभागणी त्यांच्या मृत्यूनंतर होणार आहे.

चाळीस हजार कोटींची संपत्ती सोडून अजहन झाले संन्यासी

आनंद कृष्णन मलेशियातील उद्योग जगतातला तिसरे सर्वात श्रीमंत अब्जाधीश म्हणून त्यांची जगभर ओळख आहे. त्यांची संपत्ती ४० हजार कोटी इतकी संपत्ती आहे.अशा एका अब्जाधीशांचा एकुलता एक मुलगा वेन अजहन सिरीपन्यो यांनी आपल्या वडिलांच्या सर्व संपत्तीचा त्याग करून वयाच्या आठराव्या वर्षी एक धाडसी निर्णय घेऊन, ते बौद्ध संन्याशी बनले आहेत.वेन अजहन सिरिपन्यो सध्या थायलंड - म्यानमारच्या सीमेजवळ दताओ डम मठाचे ते मठाधीश आहेत. त्यांची दिनचर्या सकाळी लवकर उठून ध्यान - साधना कारणे नंतर रोज वेगवेगळ्या गावात जाऊन उदरनिर्वासाठी भिक्षा मागणे,व आजूबाजूच्या छोट्या मोठ्या गावात जाऊन गोरगरीब गावकरी, लहान मोठी मुले विद्यार्थी तरुण-तरुणींना ध्यान - साधना आणि प्रवचनाच्या माध्यमातून साधी राहणी आणि उच्च विचारसनीचे अध्यात्मिक तत्त्वज्ञान, शिकवत आहेत. त्यामुळे मनुष्याच्या जीवनात मोठया प्रमाणात पुढील प्रमाणे बदल होऊ शकतात,असे ते सर्वांना सांगतात.मनाचा चंचलपणा, बेचैनी,आळस, चिंता,काळजी, ताणतणाव,स्मरणशक्ती,ग्रा हनशी लता,भय,न्यूनगंड,सशंकता ,वैर, क्रोध,अहंकार,द्वेष दुर्भावनेपासून मुक्ती मिळून या जगात मनुष्याने सुख शांती आनंदाने जीवन कसे जगायचे याचे खूप सुंदर तत्त्वज्ञान ते सर्वांसमोर मांडत आहेत.

वडील अब्जाधिशांच्या घरात सिरिपन्यो यांचे पालन- पोषण सिरिपन्यो यांचे मोठ्या लाडात पालन - पोषण आपल्या दोन बहिणींसोबत ब्रिटनमध्ये मोठ्या सुख-समृद्धीमध्ये झाले आहे.

कराड कृष्णा विश्व विद्यापीठाच्या कुलगुरूपदी डॉ.नीलम मिश्रा यांची फेरनिवड



कराड ■ अनिल मोरे

कराड : कराड येथील कृष्णा विश्व विद्यापीठाच्या कुलगुरूपदी डॉ. नीलम मिश्रा यांची फेरनिवड करण्यात आली आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. एम. व्ही. घोरपडे यांनी दिली. डॉ. नीलम मिश्रा यांची सलग दुसऱ्या कार्यकाळासाठी ही नियुक्ती करण्यात आली आहे.तसेच कृष्णा विद्यापीठाने कुलगुरू निवडीसाठी रीतसर शोध समिती गठीत केली होती.व नवी दिल्ली येथील इन्स्टिट्यूट ऑफ लिव्हर अँड बिलीरी सायन्सेस चे कुलगुरू डॉ. दीपक टेम्पो यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या या समितीमध्ये विद्यापीठअनुदान आयोगाचे माजी सदस्य प्रा. ई. सुरेश कुमार आणि वर्धा येथील दत्ता मेघे उच्च शिक्षक आणि संशोधन संस्थेचे कुलगुरू डॉ.ललितभूषण वाघमारे यांचा समावेश होता. या शोध समितीने ३ नावे निश्चित करून ती कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले यांच्याकडे सोपवली होती. त्यातून कुलपती डॉ.भोसले यांनी डॉ.नीलम मिश्रा यांच्या नावाची निवड करत, त्यांची कुलगुरूपदी फेरनियुक्ती केली. तर २८ जानेवारीला त्यांना नियुक्तीचा आदेश देण्यात आला.

महिलांसाठी वकृत्व स्पर्धेचे आयोजन २२ फेब्रुवारी रोजी

नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : गृहिणी समाज रामदासपेठ तर्फे २२ फेब्रुवारी, शनिवारी, समाजाच्या संस्थापिका स्व.सुमतीताई सुकळीकर यांचा स्मृती प्रीत्यर्थ, महिलांकरिता वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केलेले आहे.

नागपुरातील १६ वर्षावरिल महिलांकरिता ही स्पर्धा राहिल स्पर्धेकरिता खालील विषयापैकी एका विषयावर ७ मिनीट हिंदी किंवा मराठी भाषेत बोलता येईल.

१. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक कुशल प्रशासक. २. संवेदनशीलता आणि समाज परिवर्तन. ३. नव्या पिढीचा नवा विचार. स्पर्धा १६ ते २५ व २५ ते पुढे अशा दोन गटांत घेण्यांत येईल. स्पर्धा गृहिणी समाज रामदासपेठ येथे दि. २२ फेब्रुवारी शनिवारी दुपारी १ वाजता घेण्यात येईल. प्रत्येक गटातुन प्रथम (रोख रक्कम रु २,०००), द्वितीय (रोख रक्कम रु १,५००) व तृतीय (रोख रक्कम रु १,०००) अशी बक्षीसे देण्यांत येतील. स्पर्धेत जास्तीत जास्त महिलांनी सहभाग घ्यावा असे आवाहन पुरस्कार वितरण समारंभ व स्व.सुमतीताई सुकळीकर स्मुती दिवसाचा कार्यक्रम रविवार २३ फेब्रुवारी रोजी सुप्रसिद्ध समाजसेविका अँड. पद्माताई चांदेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडेल. स्पर्धेचे आयोजन हे गृहिणी समाज तर्फे करण्यात येत आहे. स्पर्धेतील सहभागाकरिता खालील क्रमांकावर १८ फेब्रुवारी पर्यंत संपर्क साधावा. रोहिणी चितळे मो. ७७७६९८६४०८ प्राची खडककार मो. ९६२३४७७८९९ स्वाती कुळकर्णी मो. ८८०५०१८८२५

संत सेवालाल महाराज यांच्या २८६ व्या जयंती निमित्त, अभिवादन कार्यक्रम, रक्तदान शिबिर व राज्यस्तरीय कवी संमेलन सोहळा उत्साहात संपन्न

बीड ■ प्रतिनिधी



राष्ट्रसंत क्रांतिकारी सेवालाल महाराज यांच्या २८६ व्या जयंतीनिमित्त संत सेवालाल महाराज चौक जालना रोड बीड या ठिकाणी सकाळी ८-३० वाजता चौकाचे सुशोभीकरण केल्यामुळे संत सेवालाल महाराज यांची प्रतिमा चौकात बसवण्यात आली. सकाळी संत सेवालाल महाराज यांचा जळभोग करण्यात आला. संत सेवालाल महाराजांचा भोगासाठी ज्येष्ठ, श्रेष्ठ,मान्यवर यांच्या हस्ते भोग लावण्यात आला.यानंतर संत सेवालाल महाराज व माता जगदंबा यांची आरदास (इति) करण्यात आली.

आमदार संदीप (भैय्या) क्षीरसागर, माजी आमदार अमरसिंह पंडित, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, डॉ. योगेश (भैय्या) क्षीरसागर या प्रमुख मान्यवरांनी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला हार घालून पुष्प अर्पण करून अभिवादन केले. सर्व मान्यवरांनी रक्तदान शिबीर युनिटला भेट दिली.

मान्यवरांचे जयंती उत्सव समितीच्या वतीने हार, शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. माजी आमदार सय्यद सलीम सलीम, अल्पसंख्याक समाजाचे नेते सलीम जहांगीर , माजी सभापती नवनाथ शिराळे, दूध संघाचे चेअरमन विलास बापू बडगे, माननीय शांतिनाथ डोरले, डॉ.देविदास नागरगोजे, प्रकाश ठाकूर, भीमशक्तीचे डॉ.अमैंद्र विद्यागर तसेच बंजारा समाज बांधव व वेगवेगळ्या क्षेत्रातील पदाधिकारी बांधवांनी संत सेवालाल महाराज चौकातील येऊन संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पअर्पण करून अभिवादन केले.

सर्व समाजातील सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रातील सर्व प्रतिष्ठित व्यक्तीमहत्त्व, समाजसेवक, युवा कार्यकर्ते तरुण बांधव, सेवानिवृत्त अधिकारी,कर्मचारी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.. बीड शहरात सायंकाळी ४-०० वाजता बंजारा समाजातील सर्व महिला भगिनी यांनी संत सेवालाल महाराज चौकात येऊन संत सेवालाल महाराज यांना पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यानंतर सायंकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन नगर रोड, बीड. या ठिकाणी राज्यस्तरीय कवी संमेलन घेण्यात आले. यामध्ये राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त कवी प्राचार्य अरुण पवार परळी, डॉ. वीरा राठोड चाळीसगाव, शंकर राठोड नांदेड,सुरेश राठोड नागपूर,यांनी सर्वांचे मन जिंकून घेतले.कवी संमेलनासाठी बीड शहर व इतर तालुक्यातून समाजाचे बांधव मोठ्या प्रमाणात आले होते.

कवी संमेलनासाठी महिला भगिनी व समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

या कवी संमेलनासाठी माजी मंत्री जयदत्त (अण्णा)क्षीरसागर यांनी कार्यक्रम स्थळी भेट देऊन संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण केले. व उपस्थित समाजबांधवाला संत सेवालाल महाराज यांचे विचार आणि कार्य सांगून शुभेच्छा दिल्या.

यावेळी बीड शहरातील सर्व सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहून कवी संमेलनास प्रतिसाद दिला.हास्य कवि सम्मेलन असल्यामुळे दिवस कसा गेला ते कळाले नाही,कवी संमेलन संपल्यानंतर सर्व समाज बांधवांनी प्रसादाचा आस्वाद घेतला.

संत सेवालाल महाराज यांची २८६ व्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम रक्तदान शिबिर व कवी संमेलन अतिशय चांगल्या व नियोजनबद्ध पार पाडण्यासाठी बीड शहर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष भूषण (भाऊ) पवार, कार्याध्यक्ष अंकुश भाऊराठोड, उपाध्यक्ष परमेश्वर जाधव, सचिन पवार कोषाध्यक्ष, नितीन चव्हाण प्रसिद्धीप्रमुख , विलास भाऊ राठोड, विक्रुल पवार, उत्तम राठोड, बिबीषन राठोड यांनी अथक परिश्रम घेतले.

राज्यस्तरीय कवी संमेलन कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रा. जगन्नाथ चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्जुन चव्हाण, आभार प्रदर्शन परमेश्वर जाधव यांनी केले.

कृष्णा नदी चळवळीचा लढा सकारात्मक युवाशक्तीचा जागर; राजेंद्र केरकर व कृष्णाच्या शिलेदारांचे उल्लेखनीय काम नामदेव वाघमारे

कराड ■ राहुल पवार



सातारा कराड : कराड तालुक्यातील वडोली निळेश्वर येथे कृष्णा नदी चळवळ बारावा वर्धापन दिन साजरा करण्यात आला यावेळी बाल संस्कार केंद्र व नेहरू युवा केंद्र यांच्या वतीने कृष्णाच्या शिलेदारांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता यावेळी देशातील नद्यांची सध्याची परिस्थिती जागतिक तापमान वाढ हवामान बदल नदी संदर्भातील चर्चासत्र आयोजित केले होते याविषयी म्हणाले देशातील ३१५ मध्ये दूषित आहे महाराष्ट्रातील५४ नद्या दूषित आहे सध्या हवामान बदलामुळे पिकावर ती गंभीर परिणाम दिसून येत आहे दिल्ली सारख्या शहरात वातावरण बदलामुळे शाळा बंद ठेवण्याची वेळ येत आहे हे दुर्दैवाची बाब आहे या कार्यक्रमात गोव्याच्या लेखिका शुभदा चारी यांचं मांडवी चा अंतरंग व राजेंद्र केरकर यांचे मांडवीच काळीज या पुस्तकाविषयी माहिती देण्यात आली गोव्याच्या लेखिका समीक्षा शिरोडकर यांचं अंतरंग या पुस्तकाविषयी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली नदीचा अंतरंग जाणून घ्या व नदी आपली जननी आई तिला वाचवण्यासाठी या लढ्यात सहभागी व्हा असे आव्हान कृष्णाचे प्रवर्तक राहुल पवार यांनी केले या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने ग्रामस्थ विद्यार्थी उपस्थित होते प्रास्ताविक राहुल पवार सूत्रसंचालन शरद पवार संजय साठे जमीर पटेल संजय पवार नीता देशमुख आबासाहेब चव्हाण अशोक सुतार बाळासाहेब जाधव नामदेव वाघमारे धर्मा वाघमारे दादासाहेब वाघमारे मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते आभार अशोक सुतार मांडले

सुरूर ते वाई रस्त्याचे काम बंद पाडणार : विवेक भोसले

वाई ■ शुभम कोदे



वाई : वाई ते सुरूर रस्त्याच्या रुंदीकरण कामात ठेकेदार व संबंधित विभागाचे अधिकारी यांच्या गलथान कारभारामुळे प्रवाशांना मनःस्ताप सहन करावा लागत आहे. या रस्त्यावर विविध ठिकाणी योग्य ते दिशादर्शक फलक न लावल्यास शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा पक्षाचे तालुका उपप्रमुख विवेक वसंत भोसले यांनी दिला आहे.

यासंदर्भात पक्षाच्या वतीने दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे की, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षा कडून सुरूर पोलादपूर रस्त्याचे काम लवकरच बंद पाडणार आहोत. या रस्त्याच्या कामामुळे वाई, केंजळ, सुरूर या गावांकडे प्रवास करणारे प्रवासी पर्यटक कोमात गेले आहेत. महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळाचे अधिकारी व कॉन्ट्रॅक्टर जोमात आहेत. महाबळेश्वर, पाचगणी, वाई तालुक्यातील नागरिक व पर्यटक पूर्वीपासून वाई केंजळ सुरूर मार्गे हायवेला जात असतात. परंतु सध्या महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळ मुंबई यांच्या निगराणीखाली सुरूर ते पोलादपूर या रस्त्याचे काम सुरू आहे. केंजळ गाव ते सुरूर या दरम्यान रस्ता एक बाजूला तीन ते चार फूट पोकलेन यंत्राच्या साह्याने खणलेला आहे. प्रोजेक्ट मॅनेजर यांच्या गलथान कारभारामुळे, वाहतुकीची एक बाजू चालू आहे. त्यावरच कंत्राटदाराचे डंपर उभे करून खणलेला रस्त्याचा सर्व भाग पोकलेनद्वारे व जेसीबीद्वारे डंपर मध्ये भरला जात आहे. त्यामुळे एकच लेन असल्याने केंजळ ते सुरूर या दोन्ही गावांच्यामध्ये दोन्ही बाजूकडून वाहनांच्या रांगा लागत आहेत. तासंनतास वाहने पुढे सरकत नाहीत, लोकांना माहीत नसल्यामुळे केंजळकडून दोन दोन तीन तीन वाहनांच्या रांगा लागत आहे. तर सुरूर बाजूकडून वाहनांची तीच परिस्थिती होत आहे. संबंधित कॉन्ट्रॅक्टर व प्रोजेक्ट मॅनेजर यांनी कोणतीही दिशादर्शक फलक या ठिकाणी लावलेले नाहीत. त्यामुळे प्रवाशांना दोन दोन तास वाहनांच्या गर्दीमुळे व अरुंद रस्त्यामुळे वाहक त्रास होत आहे. कला गार्डन व वाठार फाटा या ठिकाणी हायवे ला जाण्यासाठी पाचवड अथवा जोशी वीर रस्त्याचा वापर करावा, असे दिशादर्शक बोर्ड दाखवले तर लोकांना त्रास होणार नाही.

येत्या दोन दिवसात महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळ यांनी दिशादर्शक फलक लावले नाही तर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात येणार आहे. व त्या ठिकाणी चालू असणारे काम बंद पाडण्यात येणार आहे. याची संबंधितांनी नोंद घ्यावी, असाही इशारा शिवसेनेच्या वतीने देण्यात आला आहे.

माजलगावाट संत रविदास महाराज यांची ६४८ वी जयंती हर्ष उल्हासात साजरी

माजलगाव ■ प्रतिनिधी



माजलगाव : संत रविदास महाराज यांची ६४८ वी जयंती शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठ्या हर्षउल्हासात साजरी करण्यात आली येथील माजी आमदार मोहन सोळंके यांच्या हस्ते करुन ज्योत प्रज्वलित करण्यात आली या वेळी रा.कॉ.पर्टीचे मतदार प्रमुख मोहन जगताप यांचे प्रतिनिधी अजय भैय्या जगताप, छत्रपती सा.का. संचालक संतोष आबा यादव , क्रांती सेना संस्थापक अध्यक्ष राजेश घोडे भाजप तालुकाध्यक्ष अरुण राऊत कृषी उ ब समीती उपाध्यक्ष श्रीहारी मोरे,कॉ .पर्टिचे नेते दत्ता कांबळे, पी आर पी तालुकाध्यक्ष राकेश साळवे, अशोक वाघमारे सर प्रल्हाद दळवी, किसनराव भिसे सर उपस्थित होते जयंती कमीटीच्या वतीने उपस्थित पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले सुत्रसंचलन अशोक वाडेकर सर यांनी केले

दिवसभरात सर्व पक्षांच्या नेत्यांनी अभिनंदनासाठी हजरी लावली रा.कॉ.पर्टी माजलगाव मतदार प्रमुख नारायणराव डक,रा.कॉ.पार्टीचे नेते दयानंद स्वामी, दैनंदिन कार्यारंभचे संपादक शिवाजी रांजवण, वंचित बहुजन अघाडी जेष्ठ नेते धम्मानंद साळवे, पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर शिवसेना तालुकाप्रमुखळ तुकाराम येवले, माजी नगराध्यक्ष डॉ तीडके, उपनगराध्यक्ष अविनाश जवळे, भाजप नेते प्रशांत पाटील,एम आय एम चे तालुकाप्रमुख शेख रशीद, लहुजी सेना संस्थापक अध्यक्ष भास्कर शिंदे तसेच पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ आणि सर्व नेते व समाज बांधवांनीं भेट देऊन अभिनंदन केले कमीटीच्या वतीने राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके, जयंती अध्यक्ष कृ उ बाजार समिती सचिव हारीभाऊ सवने,भाजप नेते सत्यनारायण उनवणे युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे उठाव महासंघाचे जिल्हाध्यक्ष सचिन कांबळे व समाजाच्या वतीने सर्वांचे स्वागत करण्यात आले या वेळी बोलताना जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांनी सर्व भारतीयांना संत रविदास महाराज जयंती निमित्त सुभेच्छा देऊन रविदास महाराज यांच्या कार्यालयावर मत व्यक्त केले तसेच वंचित बहुजन अघाडी उपजिल्हाध्यक्ष सचिन उजगरे यांनी संत रविदास महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी मत व्यक्त करुन सुभेच्छा दील्या या जयंती निमित्त कमीटी अध्यक्ष हारीभाऊ सवने यांनी संत रविदास महाराज यांची मुर्ती जयंतीसाठी उपलब्ध करून दिली समाजाच्या वतीने सत्कार करुन स्वागत केले तसेच पी के ग्रुपचे अध्यक्ष पद्माकर कांबळे यांनी सर्वांना महाप्रसाद म्हणून जेवण दिले त्याबद्दल त्यांचा सत्कार करुन स्वागत केले. या कार्यक्रमाची सांगता रात्री ८ वाजत संत गुरू रविदास महाराज यांची जयंती अध्यक्ष हारभाऊ सवने सहपत्नीक महा आरती करून सांगता करण्यात आली. कार्यक्रमास योगदान देणारे सत्यनारायण उनवणे,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रामप्रभु साळुंके, योगेश शिंदे, रमेश जगताप,दिलीप सोनवणे, भगवान सोनवणे,राधाकिसन भाळशेंकर, रामकीसन सोनवणे,अशोक गवळी, बालाजी कांबळे सर, तुकाराम लोकरे सर, बाबासाहेब माने,सचिन वाघमारे , वसंत वाघमारे, संतोष जाधव, संतोष खंडागळे, अर्जुन पोहेकर व सर्व समाज बांधवांनी योगदान दिले

डॉ.संतोष वनगुजरे यांची विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळावर निवड

आष्टी ■ प्रतिनिधी



आष्टी : येथील हंबर्डे महाविद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख प्रा डॉ संतोष वनगुजरे यांची नुकतीच डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. प्रा डॉ संतोष वनगुजरे यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू यांनी ७ फेब्रुवारी रोजी निवडीचे पत्र दिले आहे.

दि. २३ जानेवारी २०२५ रोजी संपन्न झालेल्या डॉ. बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये सर्व व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी आष्टी येथील अँड.बी.डी.हंबर्डे महाविद्यालयाचे क्रीडा प्रमुख डॉ.संतोष वनगुजरे यांची क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळावर सदस्य म्हणुन पुढील पाच वर्षासाठी निवड करण्यात आली. कुलगुरू अध्यक्ष असणाऱ्या या समिती मध्ये विद्यापीठ व महाविद्यालयातील क्रीडाविषयक धोरण ठरविणे, खेळाडूसाठी सोयी सुविधा उपलब्ध करून देणे या व इतर कामे समितीच्या माध्यमातून करणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रा डॉ संतोष वनगुजरे हे स्वतः खेळाडू असल्याने त्यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविलेले आहेत. विद्यापीठाचे प्रशिक्षक म्हणून ही त्यांनी नावलौकिक अशी कामगिरी बजावली असून विद्यापीठाचे संपूर्ण देशात नाव लौकिक केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांची ही निवड केली आहे.

त्यांच्या या यशाबद्दल आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष किशोर नाना हंबर्डे, सचिव अतुल मेहेर, डॉ.गणेश पिसाळ, दिलीप वर्धमाने, डॉ.गायकवाड, प्रा. महेश चवरे सर्व संचालक मंडळ, प्राचार्य डॉ सोपानराव निंबोरे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.गजानन सानप, डॉ.लांब, प्राचार्य डॉ.नवनाथ आघाव, डॉ.सचिन कंदले, डॉ.सुनील पंढरे, डॉ.बापू धोंडे, डॉ.डी.के.कांबळे, डॉ.भागचंद सानप, डॉ.शंकर धांडे, डॉ.राजेश क्षीसागर, महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद खेळाडू यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

परीट समाजातील हिरा सर्जेराव भागवत अनंतात विलीन हजारो जनसमुदायानी दिला साश्रुनयनांनी अखेरचा निरोप

तेलगाव ■ प्रतिनिधी



तेलगाव : सबंध राज्यात स्वतःच्या कार्य, कर्तत्वाने एक वेगळी ओळख निर्माण केलेल्या, परीट समाजातील हिरा म्हणून समजल्या जाणाऱ्या समाजसेवक सर्जेराव भगवानराव भागवत वय ७० यांनी उपचारादरम्यान अखेरचा श्वास घेतला. भागवत यांच्या पार्थिवावर दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास त्यांच्या शेतात अंतिम संस्कार करण्यात आले. महाराष्ट्र राज्य परीट धोबी समाजसेवा मंडळाचे ते अनेक वर्षापासून राज्य उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. त्यांनी जीवनात समाजाच्या उन्नतीसाठी अथक प्रयत्न केले संघटनेचे अध्यक्ष बालाजी शिंदे यांच्या खांद्याला खांदा लावून राज्यभर संघटनेचे कार्य वाढविण्यात त्यांचे मोलाचे योगदान राहिले. परीट समाजासाठी ते एक होते त्यांच्यामुळेच परीट समाजाचे ओळख राज्यभर निर्माण झाली होती. समाजातील लग्न जुळणी असो अथवा इतर काहीही उपक्रम असो सर्जेराव दादा यांच्याशिवाय ते कधीच पार पाडले जात नसे. त्यांच्या अकाली जाण्याने समाजाचे मोठे नुकसान झाले असून निर्माण झाली पोकळी कधीही भरून निघणारी नाही संपूर्ण हयात अगदी निरपेक्ष भावनेने समाजासाठी घालविली अंत्यसंस्कार समयी हजारोंची झालेली गर्दी ही त्यांच्या एकंदरीत जीवनातील कामाची पावतीच होती असे म्हणावे लागेल. त्यांच्या पश्चात दो पत्नी, दोन मुले दोन मुली नातवंडे असा मोठा परिवार आहे.

आरोपीस तात्काळ अटक करा अन्यथा पिडीत कुटुंबासह आंदोलन : दत्ता कांबळे

माजलगाव ■ प्रतिनिधी

अविनाश क्षीरसागर आत्महत्या प्रकरणात गुन्हा दाखल



माजलगाव : मयत अविनाश क्षीरसागर या ऊसतोड मजुराने मुकादमाच्या जाचास कंटाळून आत्महत्या केल्याचा प्रकार काल ता. १४ रोजी सिरसाळा पोलीस स्टेशन हद्दीत घटना घडली होती.

सदरील घटनेत दोन दिवस उलटूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नव्हती. आंबेडकरी चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते दत्ता कांबळे यांनी अभ्यासपूर्ण सातत्याने पाठपुरावा करून शेवटी आत्महत्यास प्रवृत्त करणे सह अनु. जाती अनु. जमाती प्रतिबंधत्मक कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करून घेतला. सदरील प्रकरणात गुन्हा दाखल होतच काँग्रेस अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी आरोपीना तात्काळ अटक करण्यात यावी अन्यथा पिडीत कुटुंबासह तीव्र आंदोलन करू असा इशारा दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रशासनास दिला आहे. सदरील घटनेत सुधारित कायद्या अंतर्गत कलम १०८, ११५(२), ३५२, व अनु. जाती अनु. जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ३(२), ३(ऩ), ३(१ी) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास करण्यास सुरुवात झाली आहे.

सदरील प्रकरणात काँग्रेस नेते दत्ता कांबळे सह, राजेभाऊ खंडागळे, धम्मानणंद साळवे, अनिल कांबळे सह कार्यकर्त्यांनी गुन्हा दाखल करण्यासाठी प्रयत्न केले.

वडवणी शहर भावसार समाज युवा कार्यकारणी जाहीर ;अध्यक्षपदी निखिल सरवदे ,कार्याध्यक्ष रंजीत लांडे , उपाध्यक्ष धिरज गार्डी तर सचिव पदी गणेश सदरे यांची निवड

बीड ■ प्रतिनिधी



वडवणी : वडवणी शहर भावसार समाज युवा कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून यामध्ये, वडवणी शहर भावसार समाज युवा अध्यक्ष म्हणून निखिल प्रवीण सरवदे, कार्याध्यक्ष रंजीत भास्कर राव लांडे, उपाध्यक्ष धीरज राजेंद्र गार्डी तर सचिव पदी गणेश अशोकराव सदरे यांची एक मताने निवड करण्यात आली निवडीनंतर त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की बीड जिल्हा भावसार समाज अध्यक्ष प्रकाशराव कानगावकर यांच्या सूचनेवरून बीड जिल्ह्यामध्ये भावसार समाज तालुका निहाय युवा कार्यकारणी स्थापन करण्यात येत आहे. त्यानुसार वडवणी भावसार समाजाच्या युवकांची नुकतीच अध्यक्ष महेश सदरे यांच्या अध्यक्षते खाली तर उपाध्यक्ष विक्रम गार्डी ,मंगेश गार्डी भगवान पतंगे,सचिन गार्डी, राधाकिसन लांडे, प्रकाश पतंगे, सुधाकर तेरकर ,राजेंद्र गार्डी यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये हिंगलाज माता मंदिर वडवणी येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये वडवणी शहर युवा भावसार कार्यकारिणी अध्यक्ष म्हणून निखिल सरवदे कार्याध्यक्ष रंजीत लांडे,उपाध्यक्ष धिरज गार्डी सचिव म्हणून गणेश सदरे तर कोषाध्यक्ष निखिल दिगंबर पतंगे ,सहसचिव सुरज सुभाष गार्डी ,तर उर्वरित कार्यकारिणी मध्ये वैभव संतोष पतंगे ,अनिकेत भारत सरवदे ,राज आसाराम पतंगे, अजित रमेशराव गार्डी,अभिषेक वेंकट लांडे, आर्यन नितीन गार्डी ,साहिल भगवान पतंगे ,करण भाऊसाहेब गर्जे ,प्रथमेश विठ्ठल गार्डी , संचित सुभाष गार्डी, आदित्य सुधाकर लांडे यांची निवड करण्यात आली. दरम्यान या निवडीनंतर नवनिर्वाचित कार्यकारिणीचा बीड जिल्हा कार्यकारणीच्या वतीने जिल्हाध्यक्ष प्रकाशराव कानगावकर, उपाध्यक्ष गोपाळराव कंकाळ, सचिव अनिल राव सूत्रे, कोषाध्यक्ष कल्याणराव पतंगे, प्रदीपराव भावसार, प्रभाकरराव हजारे,कैलासराव रंगदळ ,मेत्रजकर, दत्ता पाखरे तर वडवणी भावसार समाजाच्या वतीने अध्यक्ष महेश सदरे उपाध्यक्ष विक्रम गार्डी यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देत सत्कार करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

या वेळी झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात बोलताना बीड जिल्हा अध्यक्ष प्रकाशराव कानगावकर यांनी सांगितले की, बीड जिल्ह्यामध्ये भावसार समाजाच्या युवकांना संघटनेच्या माध्यमातून एकत्र करून त्यांच्या समोर असलेल्या अडचणी त्यामध्ये बेरोजगारी, विवाह विषयक समस्या, व्यवसाय, छोट्या छोट्या उद्योगांना शासन,बँकांकडुन व ईतर मागासवर्गीय महामंडळा कडुन कशा प्रकारे अर्थसाहाय्य मिळविता येईल, जेने करुन समाजातील युवक आर्थिक दृष्ट्या सक्षम होईल.या साठी प्रयत्न केले जात आहेत.त्यासाठी समाजातील युवकांनी एकत्र येण्याची गरज आहे.तरी समाजातील युवकांनी एकत्रित येऊन आपला व समाजाचा विकास करावा असे आवाहन त्यांनी यावेळी उपस्थित युवकांना केले.यावेळी वडवणी भावसार समाज युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांनी विविध योजनेसाठी ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी काढून घ्यावे : शंकर झाडे

बीड ■ प्रतिनिधी



बीड वडवणी : भारत कृषी अभियानांतर्गत भारत देशातील अनेक राज्यांमध्ये शेतकऱ्यांसाठी शासनाच्या वतीने ?ग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळखपत्र क्रमांक योजना सुरू आहे . शेतकरी ओळखपत्र हे ?ग्री स्टॅक प्लॅटफॉर्म चा महत्त्वाचा भाग आहे.

जो शेतकऱ्याची ओळख सुरक्षित करण्यात आणि त्यांना सरकारी सेवेचा लाभ मिळवून देण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. केंद्रशासनाने आधार कार्ड धरतीवर ?ग्रीस्टॅक फार्मर आयडी कार्ड योजना राबविली आहे. महसूल विभाग योजना ?ग्री स्टॅक योजनेच्या माध्यमातून कार्ड काढण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे सुरू आहे.

हे प्रत्येक शेतकऱ्यास ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी (शेतकरी ओळख क्रमांक)

काढणे अनिवार्य आहे.हे कार्ड महा ई सेवा केंद्रात काढून घेणे.यापुढील काळात शेतकऱ्यांना पी.एम.किसान योजना,पीक विमा, नैसर्गिक आपत्ती अनुदान,पिक कर्ज,व इतर शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी ही नोंदणी आवश्यक आहे.नोंदणी न केल्यास शेतकऱ्यांना कुठल्याही शासकीय योजनांचा लाभ मिळणार नाही.यांची नोंद घ्यावी .शेतकऱ्याची ओळख सुरक्षित करण्यात आणि त्यांना सरकारी सेवेचा लाभ मिळवून देण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

सदरील ओळखपत्र सर्व शेतकऱ्यांनी केंद्र शासन व राज्य शासनाच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी काढणे आवश्यक आहे शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) काढण्यासाठी आधार कार्ड, मोबाईल नंबर, तसेच शेतीचा गट नंबर, माहीत आवश्यक आहे.तरी सर्व शेतकरी बांधवानी लवकरात लवकर काढून घेणे .असे आवाहन ग्राहक पंचायत महाराष्ट्र वडवणी तालुका अध्यक्ष शंकर झाडे यांनी केले आहे. शेतकरी ओळखपत्र ही आधार कार्ड अद्वितीय डिजिटल ओळखपत्र आहे जी राज्य भूमी अभिलेख प्रणालीशी सक्रिय जोडलेली आहे ओळख पत्र शेतकऱ्याच्या जमिनीच्या नोंदीमध्ये बदल झाल्यावर शेतकरी ओळखपत्र आपोआप अपडेट होईल. . किसान आयडी , शेतकरी- केंद्रित फायदे प्रदान करण्याचे उद्दिष्ट ठेवतो. कृषी क्षेत्रातील केंद्र सरकारच्या विविध योजना आणि सेवा शेतकऱ्यांना सुलभ आणि प्रभावीपणे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे पाऊल उचलण्यात आले आहे. शेतीची संबंधित कामासाठी कर्ज प्रक्रिया सोपी करणे शेतकरी आयडीचा वापर शेतकऱ्यांना कोणत्याही कागदपत्राशिवाय किंवा बँकांना भेट न देता कर्ज देण्यासाठी केला जाऊ शकतो . शेतकरी नोंदणी शेतकऱ्याची पडताळणी पात्रता स्थापित करते. यामुळे शेतकऱ्यांना वारंवार केवायसी करण्याच्या त्रासातून मुक्तता मिळणार आहे. शेतकरी नोंदणी मध्ये नोंदणी केल्यानंतर भविष्यात शेतकऱ्यांना पंतप्रधान किसान सन्मान निधीच्या हप्त्याचा लाभ मिळेल. जर ओळखपत्र आले नाही तर योजनेचा लाभले घेता येणार नाही. शेतकरी नोंदणी द्वारे शेतकऱ्याचे जीवनमान सुधारण्यासाठी चांगल्या योजनाआखता येतील. मात्र जे ओळखपत्र काढणार नाही त्यांना मिळणाऱ्या लाभापासून वंचित राहावे लागेल. शेतकरी ओळखपत्राच्या माध्यमातून कर्ज घेण्यास मदत मिळू शकेल. तसेच खते बियाणे कृषी उपकरणे खरेदी करण्यासाठी अनुदानाचा सुविधा मिळेल त्यासाठी सर्वांनी ओळखपत्र काढणे अत्यंत आवश्यक आहे.

४१ इमारतींमधील हजारो बेघर नागरिकांना खरी गरज पुनर्वसनाची;शासकीय कोट्यातून ३३ टक्के आरक्षित भूखंड प्राप्त झाल्यास रहिवाशांचा प्रश्न मार्गी लागला जाईल

परभणी ■ दत्तात्रय कराळे



परभणी : मुंबई उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ४१अवैध इमारतींवर तोडू कारवाई करुन महापालिकेने त्या सर्व भूईसपाट केल्या आहेत. त्यामुळे नाईलाज म्हणून या सर्व विस्थापित नागरिकांना रस्त्यावरच पाल ठोकून आपला गुजारा करणे भाग पडले आहे. तथापि इयत्ता १२-१०च्या शेकडो विद्यार्थ्यांना ऐन परिक्षेच्या तोंडावर मनपाने विस्थापित केले असल्याने ते सर्व विद्यार्थी परिक्षा व अभ्यासापासून वंचित अशा दुहेरी संकटात सापडले आहेत. त्याशिवाय कित्येक माता भगिनी गरोदर व प्रसूती अवस्थेतील गर्तेत सापडल्यामुळे त्यांनाही नानाविध यातना सहन कराव्या लागत आहेत.

दरम्यान, नालासोपारा पूर्वेतील अग्रवाल नगरी परिसरात डम्पिंग ग्राऊंड व मल निस्सारण प्लान्टसाठी आरक्षित भूखंडापैकी ३३ टक्के भूखंडावर या सर्व हजारो बेघर नागरिकांचे पुनर्वसन करुन त्यांना दिलासा देण्याची खरी गरज आहे. दैनिक जनमत या मराठी वृत्तपत्राने सर्वप्रथम आवाज उठवून विस्थापित हजारो नागरिकांच्या पुनर्वसनाची मागणी केली आहे. किंबहुना त्याच अनुषंगाने वसई-विरार महापालिकेचे माजी महापौर रुपेश जाधव यांनी पुढाकार घेऊन ?ड.चेतन भोईर, ?ड.बॅरी डिसोजा आणि ?ड.विजय कुर्ले या पथकाच्या माध्यमातून एक जनहित याचिका दाखल करुन न्यायालयात पुनर्वसनाची मागणी करुन विस्थापितांना खंबीर पाठिंबा दिला आहे.

१० फेब्रुवारी २०२५ रोजी दाखल जनहीत याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयातील मुख्य न्यायमूर्ती अलोक आराधे आणि न्यायमूर्ती भारती डोंगरे यांच्या खंडपीठाने मानवीय दृष्टीकोनातून तात्काळ दखल घेतली असून सदर नागरिकांच्या पुनर्वसनासाठी काय प्रयत्न चालविले आहेत, त्यासाठी काय नियोजन केले आहे, या बाबत आपले काय म्हणणे आहे, ते आगामी ६ मार्च २०२५ रोजी खंडपीठापुढे सविस्तरपणे मांडले जावेत, अशा प्रकारचे निर्देश महाराष्ट्र सरकार व महापालिका आयुक्त, वसई-विरार यांना दिले आहेत. तीन आठवड्याचा कालावधी त्यासाठी दिला असून राज्य सरकार व मनपा आयुक्त वसई-विरार याप्रकरणी नेमकी काय भूमिका घेतात, हे लवकरच कळून येणार आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने त्यात हस्तक्षेप करणे संयुक्तिक ठरणारे नव्हते, परंतु माध्यमं आणि नागरिक यांनी मानवीय दृष्टीकोनातून केलेली विनंती माननीय मुंबई खंडपीठाने विचारार्थ घेत संबंधितांना म्हणणे मांडण्याचे दिलेले निर्देश मोठ्या प्रमाणात आशादायी ठरणारे आहेत.

दरम्यान, या प्रकरणी सरकार तथा महापालिका यांचे म्हणणे निर्णायक असेल तर 'सोने पे सुहागा' असेच राहील. परंतु जाणीवपूर्वक हतबलता दाखवत जबाबदारी झटकण्यासाठी जर हात वर केले तर मात्र माननीय खंडपीठाने यात हस्तक्षेप करणे व मानवीय न्याय देणे हे सुध्दा तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे. यातून निस्वार्थपणे तोडगा काढणे गरजेचे असून शासकीय तथा निमशासकीय आरक्षित एकूण भूखंडापैकी ३३ टक्के भूखंड नियमाप्रमाणे विस्थापित नागरिकांना देता येऊ शकेल. जर तसे झाले तर आणि माननीय खंडपीठाने सहकार्याच्या भावनेने मनावर घेतले तर निश्चितपणे संबंधित हजारो. नागरिकांना दिलासा मिळू शकेल. सदर ३३ टक्के भूखंडावर कोणत्याही खासगी विकासकांच्या माध्यमातून विकसित करणे शक्य होईल, ज्यामुळे विस्थापित सर्वांना हक्काचं घर (निवारा, छप्पर) मिळू शकेल. त्याच ३३ टक्के भूखंडावर विस्थापित हजारो नागरिकांना संख्येनुसार हक्काची घरं प्राप्त होऊ शकतील. उर्वरित घरं विकासक बाजारभावाने विक्री करुन आपला खर्च वसूल करु शकेल.

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती अलोक आराधे , न्यायमूर्ती भारती डोंगरे यांनी या प्रकरणी विशेषत्वाने न्याय प्रदान करुन महाराष्ट्र सरकार व महापालिका प्रशासनास आपण देणे अपेक्षित निर्णय सक्तीने बाध्य करावा, अशी विनंती राहील. असे झाल्यास माननीय खंडपीठाचा निर्णय दुआ आणि दवा यासारखेच ठरले जाईल, यात तीळमात्र शंका नसावी.

याप्रकरणी महाराष्ट्र सरकार व महापालिका प्रशासनाकडूनही सहकार्याची भावना अपेक्षित राहील. मानवीय दृष्टीकोनातून योग्य असा निर्णय घेतला गेल्यास हा प्रश्न कायमचा निकाली निघू शकेल.

रयत बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने रयत महोत्सवाचे आयोजन

परभणी ■ अरविंद कांबळे



परभणी : परभणी-रयतेचे मांगले हेच आमुचे ब्रीद घेऊन रयत बहुउद्देशी सेवाभावी संस्थेची स्थापना करण्यात आली व स्थापनेपासून संस्थेच्या वतीने विधवा ,निराधार, परित्तक्त्या, घटस्फोटीत ,भूमिहीन ,शेतमजूर, शेतकरी ,कष्टकरी ,महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून त्यांना सक्षम करण्याचे काम करण्यात येत आहे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त संस्थेच्या वतीने एक फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी पूर्ण महिना रयत महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे या महोत्सवाच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकाला आर्थिक साक्षरतेचे प्रशिक्षण देऊन त्यांना सक्षम करण्यात येत आहे या महोत्सवाच्या माध्यमातून गावागावात आर्थिक साक्षरतेचा प्रशिक्षण देऊन लोकांना आर्थिक साक्षर केलं जात आहे या माध्यमातून आर्थिक नियोजन, बचत आणि गुंतवणूक ,विमा ,ग्राहक संरक्षण कायदा ,अटल पेन्शन योजना, व इतर शासकीय योजना विषयी प्रशिक्षण देऊन विविध शासकीय योजनेत लोकांना जोडण्याचे काम केले जात आहे याबरोबरच बेरोजगार युवक युवतींना रोजगार विषयक प्रशिक्षण देऊन रोजगार निर्मितीसाठी मार्गदर्शन करण्यात येत आहे तरी या उपक्रमाचा गरजू महिलांनी व युवकांनी आवश्यक लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा सो स्वाती गजानन सुरवसे यांच्याकडून केले जात आहे.

वाई शेती उत्पन्न बाजार समितीत नवीन हळद आवक सुरू उंच्चाकी दर रू.१६१००/-

वाई ■ शुभम कोदे



वाई :वाई शेती उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य मार्केट यार्डवर नवीन हळदीची एक हजार पोत्यांची आवक होवून मा.श्री. प्रमोद दादा शिंदे व्हा. चेअरमन किसनवीर सहकारी साखर कारखाना लि. भुईज यांचे हस्ते हळद लिलाव शुभारंभ झाला. हळदीचा दर क्विंटलला रू.१३०००/- ते रू.१६१००/- निघाला आहे. मिठालाल लख्मीचंद जैन यांचे काट्यावर शेतकरी श्री. दत्तात्रय डेरे यांना रू.१६१००/-, कांतीलाल भुरमल यांचे काटयावर शेतकरी श्री. अनिल कचरे यांना रू.१६०००/-, तसेच पारसमल मदनलाल यांचे काटयावर शेतकरी श्री. संतोष इथापे यांना रू.१६०००/- तसेच शेतकरी श्री. नितीन करपे यांना साहेबराव शेलार यांच्या काटयावर रू.१६०००/- एवढा दर मिळालेला आहे.

हळद लिलाव शुभारंभ प्रसंगी राष्ट्रवादी प्रदेश सरचिटनिस श्री. प्रतापराव पवार बाजार समितीचे सभापती मा.श्री. मोहन जाधव, उपसभापती मा.श्री. विनायक येवले, संचालक मा.श्री. रमेश गायकवाड, मा. श्री. केशव गाढवे, मा.श्री.तानाजी कचरे, मा.श्री. राहुल डेरे, मा.श्री. पोपट जगताप, मा.श्री. रविंद्र मांढरे, श्रीमती शकुंतला सावंत, मा.श्री. राहुल वळकुंदे, मा.श्री. विवेक भोसले, मा.श्री. संजय मोहळकर, मा.श्री. दत्तात्रय बांदल, मा.श्री.अशोक सोनावणे, मा.श्री. तुकाराम जेथे, मा.श्री. नानासो शिंदे, मा.श्री. सचिन फरांदे बाजार समितीचे माजी संचालक राजेंद्र कदम, राजेंद्र सोनावणे, विक्रमसिंह पिसाळ उपस्थित होते. खरेदी विकी संघाचे चेअरमना मा.श्री. मदन भोसले याप्रसंगी व्यापारी कांतीलाल भुरमल, दिपचंदशेट ओसवाल, मदन ओसवाल, हेमंत जैन, मिठालाल जैन,, शंकर शेठ, मदनलाल ओसवाल, प्रविण ओसवाल, रविंद्र कोरडे, साहेबराव शेलार, विनोद पावशे, विश्वास हगवणे, प्रविण ओसवाल, विनोद भुरमल, महेश फरांदे तालुक्यातील हळद उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

बाजार समितीच्या सभापती श्री. मोहन जाधव यांनी आपल्या भाषणात हळद लिलाव दर सोमवारी व दर शुक्रवारी काढावेत. शेतक-यांच्या हळद या शेतमालास जास्तीत जास्त दर देण्याचा प्रयत्न करावा. तसेच शेतक-यांनी ही आपण आपला हळद हा शेतमाल स्वच्छ करून वाई मार्केटवर आणावा. परस्पर बाहेर व्यापा-यांना घातलेस वजनात व पेमेंट मध्ये फसवणुक होणेची शक्यता आहे.

त्यामुळे वाई मार्केटवरच हळद विक्रीसाठी आणावी असे आवाहन केले.

पंकज गणवीर यांना राज्यस्तरीय पत्रकाररत्न पुरस्कार प्रदान

पुणे ■ विवेकानंद फंड



पुणे : अहील्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदे तालुक्यातील ढवळगाव येथील दैनिक लोकमतचे पत्रकार पंकज गणवीर यांना एक मैफिल कवितांची साहित्य मंच महाराष्ट्र राज्य यांच्याकडून १६ फेब्रुवारी रोजी पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल राज्यस्तरीय पत्रकाररत्न पुरस्कार सत्यशोधक विचारमंथन आश्रम पिंप्री कोलंदर ता. श्रीगोंदा येथे ह.भ.प. बाळासाहेब धोत्रे महाराज, जेष्ठ साहित्यीक गझलकार रज्जाक शेख, प्रसिद्ध युवा कवी सागर काकडे, जेष्ठ पत्रकार नितीन बारवकर, सरपंच अरणगांव दुमाला मोहनराव आढाव, उद्योजक सचिन कातोरे,सोमनाथ चौधरी, महाबली मिसाळ व मान्यवर कवीच्या उपस्थित प्रदान करण्यात आला. यावेळी भव्य राज्यस्तरीय काव्य स्पर्धा पार पडली.

पत्रकार पंकज गणवीर यांनी पत्रकारिता क्षेत्रामध्ये गेली २४ वर्ष श्रीगोंदयासह शिरूर व पारनेर परिसरातील अनेक सामाजिक उपक्रमाला आणि सर्वसामान्य गोरगरिबांना न्याय देण्यासाठी आपल्या लेखणीतून प्रयत्न केला.शेतकऱ्यांच्या वीज,पाणी यासारख्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांसोबत, शैक्षणिक,कृषी,अध्यात्मिक,क ला,क्रिडा,सांस्कृतिक तसेच शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर कार्यशाळांना दैनिक लोकमतच्या माध्यमातून वेळोवेळी प्रसिद्धी देऊन अनेक कामे मार्गी लावलीआहेत.विशेषता शिरूर-बेलवंडी रस्त्याच्या दुरावस्थेबाबत वारंवार वर्तमानपत्रातील बातम्यांच्या माध्यमातून प्रशासनाला जागे करण्याचे काम तसेच बागायती उसाचे क्षेत्रात बिबट्याची मोठ्या प्रमाणात दहशत या ठिकाणी परिसरामध्ये होती त्या संदर्भात वेळोवेळी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करून वनखात्याकडून अतिरिक्त पिंजरे मिळवण्यास यश मिळवले.

पत्रकारितेच्या माध्यमातून वर्तमानपत्रातून विविध सामाजिक बातम्या प्रकाशित करून प्रशासनाचे लक्ष वेधण्याचे काम केले. सामाजिक बांधिलकी जोपासत गेली अनेक वर्ष हे अविरत काम सुरू आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन एक मैफिल कवितांची साहित्य मंच यांनी त्यांना यावर्षीच्या पत्रकाररत्न पुरस्काराने सन्मानित केले.

पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांना द युवा ग्रामीण पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य सहसचिव तथा शिरूर तालुका ग्रंथालय संघ अध्यक्ष विवेकानंद फंड यांनी तसेच राजकीय, सामाजिक, साहित्यिक व शैक्षणिक क्षेत्रातील अनेकविध मान्यवरांकडून सत्कार करून अभिनंदन व शुभेच्छा देण्यात येत आहेत.

वाई तालुक्यातील पांडवगडावर गिर्यारोहकांवर मधमाशांचा हल्ला; सहा जणांवर केला हल्ला दोन जण गंभीर जखमी

वाई ■ शुभम कोदे



वाई : वाई तालुक्यातील पांडवगडावर इंदापुर तालुक्यातील सहाजणांनवर हजारो मधमाशांनी आज सकाळी सात वाजता भीषण हल्ला करून चावा घेतल्याने अल्हाद दंडवते निखिल क्षिरसागर गोपाळ आवटी गोपाळकर दंडवते,संतोष जापे, चैतन्य देवळे इतर दोन बेशुद्ध अवस्थेत आहेत.याची माहिती वाई पोलिसांना आणी वाई पंचायत समिती मध्ये असणारे वाई तालुका वैद्यकीय कक्षाला समताच पाच रुग्ण वाहिकासह वाई पोलिस ठाण्याचे हवलदार श्रीनिवास बिराजदार डिबीचे विभागाचे नितीन कदम कवठे प्राथमिक आरोग्य केंद्रातील डाक्टर दिलिप भोजने नरेंद्र सणस सि.बी.जाधव अजीत चव्हाण गिता वाठारकर या वैद्यकीय टीमने तातडीने पाच किमी. डोंगर चढून घटनास्थळी पोहोचले आणी जखमीनचा शोध घेवून त्यांच्यावर प्राथमिक उपचार सुरू करून तब्बल पाच किलो मीटर पाऊल वाटेने खाली आणण्यात आले.पुढील उपचारासाठी त्यांना रुग्णवाहिकेतून वाईच्या ग्रामीण रूग्णालयात दाखल केले आहे .

लोणीचा अमोल लंके याची महसूल सहाय्यक पदी निवड

लोणी-धामणी ■ कैलास गायकवाड



लोणी -धामणी : लोणी ता. जि. पुणे येथील अमोल जगन्नाथ लंके याची महसूल सहाय्यक पदी निवड झाली आहे. प्रसिद्ध निवेदक जगन्नाथ रभाजी लंके व ज्योती यांचा मुलगा असून आई-वडील दोघेही शेतकरी असून तिघाही मुलांना उच्च शिक्षण दिले. अमोल चे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोणी येथे झाले असून, माध्यमिक शिक्षण श्री भैरवनाथ विद्या धाम लोणी व उच्च माध्यमिक शिक्षण शिरुर येथे झाले आहे. बीएससी झूलॉजी एस पी कॉलेज पुणे येथे केले आहे . स्पर्धा परीक्षेसाठी २०२० पासून तो प्रयत्न करत होता. २०२३ ला पार पडलेला परीक्षेचा निकाल २०२५ रोजी लागला. दोन वर्षाच्या प्रतीक्षे नंतर महसूल सहाय्यक निवड झाली. अमोल यांने आपल्या यशा मध्ये कष्ट करणाऱ्या आई-वडिलांचा, मामा, भाऊ, ग्रामस्थ यांचे मार्गदर्शन लाभले असल्याचे आवर्जून सांगितले. पुढील काळातही स्पर्धा परीक्षा उच्चपदा साठी प्रयत्न करणाऱ्या सांगितले. तरुणांनी आहे त्या परिस्थितीला सामोरे जाऊन स्पर्धा परीक्षांसाठी अभ्यास करावा असे आवाहन केले आहे.

वडोली निळेश्वर च्या डोंगराला आग;वनसंपदा जळाली. शेतातील ठिबकचे ही नुकसान

कराड ■ राहुल पवार



सातारा कराड : प्रत्येक वर्षी उन्हाळ्याच्या तोंडावर डोंगर पेटवण्याचे प्रकार होत असल्याने वनसंपदा वन्य प्राण्यांचा अधिवास धोक्यात येत आहे करवडी व वडोली निळेश्वर गावच्या हद्दीत अज्ञात व्यक्तींनी डोंगर पेटवल्यात आल्याने वनसंपदा वन्यप्राणी तसेच स्थानिक शेतकऱ्यांची पिकांची हानी झाली... वडोली निळेश्वर मधील प्रकाश पवार. प्रकाश यादव. रवींद्र जगदाळे. राजेंद्र यादव. शंकर मदने. हर्षल नांगरे. पिकासह ठिबक सिंचन जळून खाक झाले वडोली निळेश्वर येथील गाव वडाचा डोंगर कोकणाचा डोंगर नारायणगाव खडी काल दुपारी दोनच्या सुमारास अंतवडीच्या बाजूने अज्ञात व्यक्तीकडून वनवा लावण्यात आला त्यामुळे वनसंपदा प्राण्यांचे मोठे नुकसान झाले. वन अधिकारी युवक शेतकरी मानसिंग मदने. जालिंदर भोसले. अमित पवार. अविनाश डुबल. प्रकाश पवार. दिलीप शेवाळे. अमोल डुबल. सुनील पवार. राजू पवार. अक्षय डुबल. रणवीर वाघमारे यांच्यासह ग्रामस्थांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला परंतु आगीची तीव्रता जास्त असल्यामुळे त्यांना अपयश आले घटनास्थळी मंडल अधिकारी तातडीने तलाठ्यांनी धाव घेतली आगीचे कारण समजू शकले नाही अशा घटना होऊ नये यासाठी वन खात्याने उपाययोजना कराव्या अशी मागणी ग्रामस्थ पर्यावरण प्रेमी नागरिक करत आहेत

नातवंडांच्यासंगे भरली आजी आजोबांची शाळा

सातारा ■ मंगेश माने



सातारा, खंडाळा: लोणंद : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोणंद मुली ,तालुका खंडाळा येथील श्री जाधव सर आणि जाधव मॅडम यांनी एक अनोखा उपक्रम राबविला.

आजच्या २१ व्या शतकात आजी आजोबांच्या प्रेम खूप कमी मुलांना लाभत आहे. नोकरी, व्यवसाय ,विभक्त कुटुंब पध्दत यामुळे नातवंडे आणि आजी आजोबा यांच्यातील नात्याचा ओलावा कमी झालेला पाहायला मिळतोय.

आज आनंददायी शनिवार अंतर्गत शाळेमध्ये या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले होते, आजी आजोबांचे स्वागत त्यांच्या नातवंडांच्या हस्ते करण्यात आले.त्यानंतर सौ जाधव मॅडम यांनी प्रार्थना गायन केले यावेळी सर्वजण लहानपणी च्या आठवणीत हरवल्याच जाणवलं. अनेक आपल्या नातवासोबत शाळेमध्ये डबा खाण्याचा आनंद आजी आजोबांनी लुटला, त्यांना घास भरवत असताना आपोआप त्यांच्या डोळयात अश्रू आल्याचे दिसून आले.

नातवासोबत आपणही लहान आहोत याची जाणीव प्रत्येकाला झाली, संसार ,कर्तव्य ,जबाबदारी यातून जरा बाजूला होऊन काहीं क्षण जगावेत असे प्रत्येकाला वाटलं.कार्यक्रम संपेपर्यंत कोणीही मोबाईल वापरला नाही सर्व विसरून उपक्रमाचा आनंद घेतला. यानंतर आनंददायी खेळ घेण्यात आले प्रत्येक आजी आणि आजोबा आपले वय विसरून आनंदाने खेळ खेळत होते. काही आजींनी पारंपरिक उखाणे घेतले, कविता सादर केल्या, नाट्यछटा सादर केल्या, आजोबांनी उस्फूर्तपणे अभंग,गवळणी ,ओव्या सादर केल्या यातून आपला वारसा पुढील पिढीपर्यंत पोहचण्यास मदत झाली.

आजी आजोबांनी तीन पिढ्यातील फरक सांगितले, स्वानुभव ,बदलेल वातावरण, नातेसंबंध यावर उपाय फक्त संस्कारित पिढी निर्माण करणे. शिक्षणाबरोबर आजी आजोबांची अनुभवाची शिदोरी नातवंडांच्या आयुष्यात असावी . तीन पिढीतील अंतर कमी होऊन नातेसंबंध सुधारण्यासाठी या उपक्रमाची मदत होईल असे अनेकांनी व्यक्त केले.

यावेळी जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था फलटण चे अधिव्याख्याता मा कृष्णा फडतरे, मा केंद्रप्रमुख शिवाजी साळुंखे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सौ दिपालीताई रवींद्र क्षीरसागर, मुख्याध्यापिका सौ छाया पांडुरंग क्षीरसागर, पत्रकार रमेश धायगुडे, पत्रकार गणेश भंडलकर ,आजी आजोबा आणि विद्यार्थी उपस्थित होते.

छत्रपती शंभुराजे इंग्लिश स्कूल कंधार येथे वार्षिक स्नेहसंमेलन (भक्ती प्रेम एक उत्सव) संपन्न; शेकडो पालकाच्या उपस्थितीत वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

कंधार ■ संतोष कांबळे



कंधार : कंधार येथील छत्रपती शंभूराजे इंग्लिश स्कूल मध्ये दि.१५ फेब्रुवारी रोजी रात्री वार्षिक स्नेह संमेलन थाटामाटात संपन्न झाले. स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून मुलांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव मिळते विद्यार्थ्यांसाठी स्नेहसंमेलन एक हक्काचे व्यासपीठ असते. विद्यार्थ्यांवर मूळ संस्कार हे प्राथमिक शिक्षकच करतात. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध गुणदर्शन कार्यक्रम उपयुक्त ठरतात. पुस्तकी अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांनी विविध कला, चांगले छंद जोपासावेत. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम छत्रपती शंभूराजे इंग्लिश स्कूल कंधार नेहमीच करत असते.

माजी आमदार भाई गुरुनाथराव कुरुडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटक गोविंदसिंह दत्तासिंह ठाकुर, प्रमुख उपस्थिती श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रा.डॉ.पुरुषोत्तम धोंडगे, इंग्लिश स्कूलच्या अध्यक्षा तथा प्राचार्या डॉ. सौ.मनीषाताई धोंडगे,सोसायटीचे उपाध्यक्ष माधवराव पेठकर,गुरुनाथ पेठकर, प्रा.रावसाहेब डांगे, रमाकांत जोगदंड आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून उद्घाटनाचा सोहळा पार पडल्या नंतर मुलांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या स्नेह संमेलनाच्या कार्यक्रमास प्रारंभ झाला. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन चरित्र, देशभक्तीपर गीते,चित्रपट गीते, अभ्यासक्रम गीते, मराठी लावणी, झाशीची राणी,तारे गीन गीन सादर करून मुलांनी आपल्या अंगी असलेल्या कलागुणांचे दर्शन घडविले. लहान चिमुकल्याचा नृत्य पाहून पालक भरून गेले त्यांनी आपल्या टाळ्या वाजवून शाब्बासकीची थाप देत होते.उत्तरोत्तर कार्यक्रम रंगत गेला. उत्कृष्ठ नियोजन, आकर्षक रोषणाई स्नेह संमेलनाचे आकर्षण ठरले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी छत्रपती शंभुराजे इंग्लिश स्कूलच्या सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

ग्रामविकासात स्वयंसेवी संस्थानी पुढाकार घ्यावा : जया अंभोरे

सालधरा येथे शालेय तथा जिवनोपयोगी साहित्य वितरण सोहळा संपन्न

विरुळ (आ.) ■ विनोद महाजन



विरुळ आकाजी : समाजात अनेक घटक शिक्षणापासून वंचित राहतात शासनाची ध्येय धोरणे त्यांच्यापर्यंत पोहचत नाही किंवा बरेचदा या सोई सुविध्यांचे बाबतीत हे घटक पुर्णत अनभिज्ञ असतात अशा घटकांना हाथ देणे त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी समाजधुरीणांनी तसेच सामाजिक व स्वयंसेवी संस्थानी पुढाकार घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय अशा उपेक्षित घटकांची आर्थिक, सामाजिक, शैक्षिणिक उन्नती होणार नाही, अशावेळी ही जवाबदारी स्थानिक सुशिक्षित ग्रामस्थांनी एकत्रित येवून मुलांच्या शिक्षणाचा आणि ग्रामविकासाच्या कार्यक्रमाचे नियोजन करून प्रभाविपणे त्याची अंमलबजावणी केल्यास एक आदर्श ग्राम अस्तित्वात येईल अशी भावना निर्मीक ग्रामीण विकास व बहुउद्देशिय संस्था नागपुर येथील संचालिका जया सतिश अंभोरे यांनी व्यक्त केली.

त्या १६ फरवरी रोजी सालदरा येथे निर्मीक ग्रामीण विकास व बहुउद्देशिय संस्था तथा ग्रामपंचायत सालधरा व्दारा आयोजित शालेय तथा जिवनोपयोगी साहित्य वितरण सोहळ्याचे अध्यक्ष म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे उद्घाटन सालदरा या गावाचे सरंपच पुंडलिकराव साठे यांच्या हस्ते करण्यात आले. तर प्रमुख अथिती म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सतीश अंभोरे, आर्वी येथील ज्येष्ठ समाजसेवी श्यामसुंदर राठी, ऑल इंडीया शास्त्री सोशल फॉरमचे राष्ट्रीय उपाध्यक्ष इमरान राही, कारंजा (घा) येथील नायब तहसिलदार चंद्रशेखर वालके, पंजाब नेशनल बँकेचे माजी अधिकारी दिलीप मसने, निम्मवर्धा प्रकल्प विभागाचे उप-कार्यकारी अभियंता अमोल आठवले, परसोडी च्या माजी सरपंच सुरेखा पंढरे, फोरमचे माजी प्रदेश अध्यक्ष विजय नाखले, राज्य कार्यकारिणी सदस्य राजु लभाणे, सालधराचे उप-सरपंच अरूण लुंगसे, पिपंळगांवचे सरपंच सुचिता जाधव, बोथली (पांझरा) चे सरपंच तुषार नायसे, विरुळचे सरपंच ॲड दुर्गाप्रसाद मेहेरे, निजामपुर (टाकळी) चे सरपंच वैशाली कोडापे, रोहणाचे माजी सरपंच सुनिल वाघ, ग्रामसेवक नितीन साव, स्नेहालय संस्थेचे अध्यक्ष विलास कुळकर्णी, लॉयन्स क्लॅबचे अध्यक्ष विजय सत्यम, लॉयन्स क्लब गांधी सिटीचे माजी अध्यक्ष भगवानदास आहुजा, गोदावरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मोहन मोहिते, दक्ष नागरीक फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रकाश खंडार, समाजसेवी भय्याजी डोळे, राजु गेडे, बाळासाहेब गलाट, ज्येष्ठ पत्रकार शशांक चतारे, अनिल गावंडे, सचिन देवतळे पोलीस पाटील विजय दाभेकर प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते.

यावेळी सतीश अंभोरे, इमरान राही, विलास कुळकर्णी, तुषार नायसे, सरपंच पुंडलीकराव साठे यांनी सुध्दा मनोगत व्यक्त केले. पाहुण्यांच्या हस्ते १२५ गरजु महिलांना सांसारिक जिवनोपयोगी वस्तु तर ११५ विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्य वितरण करण्यात आला. कार्यक्रमाची प्रस्तावना नामदेव अखाडे, संचालन नेहा जोशी तर आभार सुरेखा पंढरे यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता दौलत धोरणाडे, गुरूदेव चोरआमले, प्रेमदास सयाम, प्रकाश शिरभाते, सुरेश कुंभेकर, वनिता गजाम, वैशाली किरतकर, तुळशा आत्राम, कल्पना कुंभेकर, रंजना गलाट, प्रेमिला जुगनाके, शालुबाई कासार, मिराबाई कोमटी, संगीता कासार, प्रियंका रौशन पंदाम, कु. फिजा खान, श्रीकांत उल्हास पवार, धनंजय खेडकर, राजेश धोपटे आदिनी अथक परिश्रम घेतले.

देवळीत एकात्मिक बालविकास सेवा योजना अंतर्गत मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन

देवळी ■ सौ.आरती गोसटकर/कारंजेकर



देवळी : एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प देवळी जिल्हा परिषद वर्धा अंतर्गत ग्रामीण महिलांचा आत्मविश्वास वाढावा या दृष्टीने स्वच्छता, आरोग्य, कुटुंब, कायदेविषयक बाबी याविषयी माहीती मिळावी याकरिता मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन भोंग सभागृह देवळी येथे करण्यात आले होते.

या मेळाव्यात अंगणवाडीत राबविले जाणारे कार्यक्रम, उपक्रम व योजना यांचे मॉडेल सेविकांनी तयार केलेले होते त्यांची प्रदर्शनी लावण्यात आलेली होती,या प्रदर्शनी ने उपस्थित मान्यवरांचे लक्ष वेधून घेतले.

मनिषा कुरसंगे उपमुख्य कार्यकारी अधिकारी महिला व बालकल्याण जि प.वर्धा यांनी देवळी प्रकल्पाचे व प्रकल्पातील सेविकांचे भरभरून कौतुक केले.या कार्यक्रमाला प्रफुल लोखंडे गटविकास अधिकारी पंचायत समिती देवळी, अनिल आदेवार साहेब सहायक गटविकास अधिकारी देवळी,पुष्पलता भोरे प्रविण प्रशिक्षक यशदा पुणे, एडव्होकेट निलीमा ताकसांडे.रेशमा रघाटाटे वन स्टॉप सेंटर वर्धा, भारती मुकदम, मिना कौरती सायबर सेल वर्धा ,स्मिता मॅडम, काजल वाघमारे सायबर सेल वर्धा,अमोल भगत ,राहुल उरकांदे ,पुरुषोत्तम कांबळे,योगेश सर वैभव राऊत रॉय महिला संरक्षण अधिकारी देवळी,शशिकला चोरे प्रभारी बालविकास प्रकल्प अधिकारी संतोष मरस्कोल्हे विस्तार अधिकारी, पर्यवेक्षिका ज्योती धनवीज, मंगला राऊत, किर्ती रूईकर, समृध्दी कदम, कनिष्ठ सहायक मेघा किन्हेकर आणि मोठ्या संख्येने ग्रामीण भागातील महिला,अंगणवाडी सेविका, मदतनीस उपस्थित होत्या. यावेळेस मान्यवरांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक शशिकला चोरे प्रभारी बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी केले व संचालन अविनाश जाधव यांनी केले व आभार प्रदर्शन संतोष मरस्कोल्हे यांनी मानले.

दिघी-बोपापूरच्या पीक स्पर्धाविजेते शेतकऱ्यांचा अकोला कृषी विद्यापीठात गौरव

देवळी ■ सौ.आरती गोसटकर/कारंजेकर



देवळी : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा, यांनी देवळी तालुक्यातील दिघी- बोपापुर गावाची आदर्श ग्राम निर्मिती करीता सन २०२२ मध्ये निवड केली. सदर गावामध्ये कृषि विज्ञान केंद्र सेलसुरा येथील सर्व शास्त्रज्ञ शेतकरी कल्याणकरिता सातत्याने प्रयत्नशील आहेत. याच अनुषंगाने दिघी बोपापुर या गावामध्ये कुलगुरू डॉ. शरद गडाख व संचालक (विस्तार शिक्षण) डॉ धनराज उंदिरवाडे यांच्या अखत्यारीत सोयबीन पीक स्पर्धा आयोजित करण्यात आली.

सोयाबीन पीक स्पर्धा ही शेतकऱ्यांसाठी आयोजित केलेली एक स्पर्धा असून या स्पर्धेचा उद्देश शेतकऱ्यांना विद्यापीठ विकसित आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक उत्पादन घेण्यासाठी प्रोत्साहित करून त्यांचे आर्थिक व सामाजिक स्थर्य निर्माण करणे आहे. करीता दिघी व बोपापुर गावामध्ये आयसीएआर-अटारी, पुणे मार्फत ऑईलसिड मॉडेल व्हिलेज प्रकल्प दरम्यान सोयाबीन पिकाची पीडिकेव्ही अंबा व सुवर्ण सोया या वाणांचे बियाणे शेतकऱ्यांना देण्यात आले. खरीप हंगाम दरम्यान कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा येथील शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले तसेच वारंवार त्यांच्या शेतावर प्रक्षेत्र भेटी देऊन तांत्रिक मार्गदर्शन केले. याच अथक प्रत्यनांचे यश म्हणजे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले व त्यांचा पीक स्पर्धेमध्ये विजय झाला. संदीप फुलमाळी यांनी एकरी १० क्विंटल, सचिन वडतकर यांनी एकरी ९.५० क्विंटल सोयाबीनचे उत्पन्न मिळविले. करीता त्यांचा डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे 'हॉर्टिकल्चर डे' उद्यानविद्या दिवस निमित्य कुलगुरू डॉ शरद गडाख, संचालक, अटारी, पुणे डॉ. शुभ्रतो रॉय व संचालक (विस्तार शिक्षण) डॉ. धनराज उंदिरवाडे तसेच उपस्थित सन्मानिय अतिथी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी सचिन वडतकर यांनी त्यांचा अनुभव कथन करीत कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञांनी कश्या पद्धतीने तांत्रिक मार्गदर्शन केले या विषयी उपस्थितांना सांगितले. सदर प्रगतिशील शेतकऱ्यांच्या उत्कृष्ट यशाबद्दल वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. जीवन कतोरे व कृविके सेलसुरा येथील शास्त्रज्ञ डॉ. रुपेश झाडोदे, डॉ अंकिता अंगाईतकर, डॉ निलेश वझीरे, डॉ सचिन मुळे, डॉ सविता पवार, डॉ प्रेरणा थुमाळ, गजानन म्हसाळ यांनी त्यांचे कौतुक केले.

भारतीय नागरिक म्हणुन प्रत्येक व्यक्तीला संविधानाची माहीती आवश्यक : डॉ.प्रमोद गारोडे

कोराडी ■ दिलीप येवले



कोराडी : आज भारतीय नागरिक म्हणुन प्रत्येक व्यक्तीला संविधानाची माहीती असणे आवश्यक आहे कारण आपल्याला आपल्या संविधानातील कलमांची पुर्णपणे माहीती नाही. आपण आपले अधिकार कोणते याची माहीती ठेवतो परंतु आपली कर्तव्ये कोणती हे आपण जाणून घेत नाही. आपण पुर्णपणे आपले संविधान वाचून समजणे अत्यंत आवश्यक आहे ,ही आपली गरज आहे .संविधानाची का गरज आहे,याची माहीती देतांना ते म्हणाले की,व्यक्तीला आपल्या वैयक्तिक हक्काचे संरक्षण करण्यासाठी, शासनासाठी एक चौकट प्रस्थापित करण्यासाठी ,कायद्याचे राज्य टिकवून ठेवण्यासाठी , स्थिरता प्रदान करण्यासाठी, नागरिकांच्या सहभागास प्रोत्साहन देण्यासाठी आणि अत्याचारापासून संरक्षण करण्यासाठी संविधानाची ख-या अर्थाने गरज आहे ,हे विद्यार्थ्यांना डॉ.प्रमोद गारोडे यांनी आपल्या वक्तव्यातून समजून सांगितले.

भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्य ' संविधान गौरव महोत्सव ' अंतर्गत तायवाडे महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागाच्या सयुक्त विद्यमाने ' भारतीय राज्यघटनेची ओळख ' या कार्यक्रमाअंतर्गत 'भारतीय संविधानाची आवश्यकता व तिचे महत्व' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.या व्याख्यानसाठी प्रमुखवक्ते म्हणुन बी.एस.पाटील महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ.प्रमोद गारोडे लाभले होते तर अध्यक्षस्थानी इग्रंजी विभागप्रमुख डॉ.वर्षा वैद्य तर डॉ.शरद डवरे,डॉ.किशोर घोरमाडे आणि राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.वकील शेख मंचावर उपस्थित होते.डॉ.प्रमोद गारोडे यांनी भारतीय संविधानाच्या निर्मितीपासून तर त्यांच्या अमंलबजावणी पर्यंतची संपुर्ण माहीती समजावून सांगितला. तसेच या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या डॉ.वर्षा वैद्य यांनी भारतीय संविधान व त्याचे महत्व आपल्या संभाषणातून विषद केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.वकील शेख यांनी तर आभारप्रदर्शन डॉ.किशोर घोरमाडे यांनी केले.या कार्यक्रमाला एन.एस.एस.चे विद्यार्थी उपस्थित होते.

अ.भा.मराठा महासंघ तर्फे शतकोत्तर रोप्य महोत्सव १९ फरवरी रोजी

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूरः अखिल भारतीय मराठा महासंघाला १२५ वर्षे पूर्ण होत असून अखिल भारतीय मराठा महासंघ शतकोत्तर रोप्यमहोत्सवी वर्ष साजरा करीत आहे. श्रीमंत राजे मुधोजी महाराज भोसले यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे व हे प्रामुख्याने उपस्थितीत राहतील. अशी माहिती परिषदेत दिलीप धंद्रे यांनी पत्रकारांना दिली. संघटनेचे माजी अध्यक्ष कै. ?ड. शशिकांत (अप्पासाहेब) पवार यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून शिवजयंतीला हेरिटेज फाउंडेशन या संस्थेच्या योगदानातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील आणि इतरही कालखंडातील अत्यंत महत्त्वाच्या बहुमूल्य साहित्यांची व पत्रांची प्रदर्शनी १९ फेब्रुवारी रोजी, गुरुदेव सेवा मंडळ, रमण सायन्सच्या बाजूला, अग्याराम देवी चौक, नागपूर येथे दुपारी १२ ते ५ या वेळेत, ठेवण्यात येणार आहे. या प्रदर्शनी छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या आयुष्यातील लिहिलेले शेवटचे मूळ प्रत, आणि पहिला हस्तलिखित ग्रंथ, फरमाणे, सनदी त्यानंतर चलनात असलेली नाणी. बहुमूल्य संग्रहित साहित्य व वस्तू तसेच मराठा कालीन अतिशय महत्त्वाचे दस्तऐवज, संत साहित्यातील हस्तलिखित ग्रंथ आणि विविध देशातील पोस्टाचे, तिकिटे व चलने या प्रदर्शनीत ठेवणार असल्याची माहिती दिली. यावेळी मंचावरील अखिल भारतीय मराठा महासंघ नागपूर जिल्ह्यातर्फे सर्व मान्यवर उपस्थित होते. या प्रदर्शनीचा सर्वांनी लाभ घ्यावा. ही माहिती दिलीप धंद्रे यांनी पत्रकारांना दिली.

ऋषी फाउंडेशन तर्फे शिक्षक-पालक मेळावा व स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : ऋषी फाउंडेशन नागपूर च्यावतीने व्यसनमुक्ती कार्यक्रम, शिक्षक-पालकांचा मेळावा, विद्यार्थ्यांची कला प्रस्तुती, आणि बक्षीस वितरण नुकतेच झालेल्या कार्यक्रमात मधुरम हॉल, विदर्भ हिंदी साहित्य संमेलन भवन येथे करण्यात आले होते. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम (ऊण्झ) नागपूर, स्वस्ती संस्था, बेंगळुरू आणि टाटा एआयजी यांचे बहुमूल्य व तांत्रिक आणि आर्थिक सहाय्य ऋषी फाउंडेशनला लाभले आहे. याउपक्रमाचा भाग म्हणून नागपुरातील १७ शाळा-कॉलेजमध्ये एक व्यसनमुक्ती विषयावर आधारित पोस्टर, चित्रकला, नाटक, भाषण, निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते. ज्यामध्ये १५० हून अधिक विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्वक उत्साहाने भाग घेतला होता. ज्यात प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आनंद घेतला. डॉ. चंद्रशेखर बी. अध्यक्ष ऋषी फाउंडेशन नागपूर च्यावतीने आभार व्यक्त केले. वक्तृत्व स्पर्धेत जय भारत कॉलेजच्या गुलाबशा करीम खान हिला प्रथम तर किदवई हायस्कूलच्या नुजहत फातिमा हिला द्वितीय पारितोषिक मिळाले. चित्रकला स्पर्धेत जय भारत शाळेतील समीर संजय सहारे आणि देवेंद्र परमेश्वर काळे यांना अनुक्रमे प्रथम आणि तृतीय तर किदवई शाळेतील नौशिन अलमास अंसारी, इकरा नाज अंसारी आणि नुजहत फातिमा यांना अनुक्रमे द्वितीय, चतुर्थ आणि पांचवं पारितोषिक मिळाले. निबंध स्पर्धेत पन्नालाल देवडिया हायस्कूलच्या अशमल सदफ हिला प्रथम तर सिद्धेश्वर जूनियर कॉलेजांच्या चंचल जीवन गद्रे आणि अंकिता शेलारे हिला अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय पारितोषिक मिळाले. तसेच अतिशय सुंदर नाट्य प्रस्तुती करणाऱ्या किदवई हायस्कूल, मौलाना अबुल कलाम आझाद हायस्कूल आणि सुरेन्द्रगढ हायस्कूल शाळांना संयुक्तरित्या प्रथम पुरस्कार देण्यात आला. तंबाखू मुक्त शाळा तयार करण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या सर्व शाळा आणि शिक्षकांना प्रोत्साहन पत्र देऊन त्यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी ऋषी फाऊंडेशन तर्फे विद्यार्थ्यांना व्यसन, कॅन्सर, इत्यादी संबंधी मदतीसाठी ७९७२६६९८५७ हेल्पलाइन क्रमांक सुरू करण्यात आलेला आहे. रंगधुन कलामंच तर्फे एक प्रबोधनात्मक कला प्रस्तुती केली. या कार्यक्रमाला सिविल सर्जन ऑफिस मधील ऊण्झ विभागाचे डॉ. विनोद पाकधुणे, ऊण्झ विभागाच्या डॉ. पूर्वाली काटकर, सोशल वर्कर वनिता चव्हाण तसेच ऋषी फाऊंडेशन कडून डॉ. सोनाली कुथे, डॉ. मयूर मुन्ने आवर्जून उपस्थित राहिले. अमृता बागडे यांनी संचालन केले तर शुभांगी वाघमारे, शुभम ढोबळे, वैभव तामगाडगे, निखिल छत्रे, नेहा नायडू यांनी साथ दिली. कार्यक्रमाचे नियोजन डॉ.आदित्य बुरीले यांनी केले.

लहान आर्वी येथे माकडाने महिलेस केले फ्रॅक्चर ग्रामपंचायतचे वनविभागाला ठरावासह निवेदन

लहान आर्वी ■ सुनिल साबळे



लहान आर्वी : स्थानिक लहान आर्वी येथे गेल्या एक वर्षापासुन माकडांचा हैदोस मोठ्या प्रमाणात वाढला आहे. लहान आर्वी येथील बस स्टॅण्ड चौकातील पिंपळाचे मोठ्या झाडाजवळ शाबीर रसुल शहॉ यांचे घर आहे.घरातील अंगणात काम करीत असताना शाबीर शहॉ यांच्या पत्नी सौ. रूबीना शाबीर शहॉ या महीलेवर माकड धावले आणि त्यांना जखमी करून फ्रॅक्चर केले.घटना गावातील असल्यामुळे मोठा अनर्थ टळला.हीच घटना जंगलात असती तर घटनेचे वास्तव मोठ्या प्रमाणात राहले असते.

लहान आर्वी येथे गेल्या एक वर्षापासुन माकडांचा हैदोस मोठ्या प्रमाणात वाढल्याने अनेक लोकांच्या घराचे नुकसान झाले आहे. यामध्ये रामहरी बोकडे, इंदीरा निकम, शाबीर शहॉ, भरत चव्हाण यांचे नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे. तसेच जि.प.उच्च प्राथमिक केंद्रशाळेतील साहित्याचे सुध्दा मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे.झाडावरून खाली आले की, विद्यार्थ्यांच्या मागे धावतो तसेच माकडांनी उड्या उड्या मारू मारू बस स्टॅड वरील प्रविण कुकडे यांचे सलुन दुकानावरील अख्खे टीनपत्र तोडुन टाकले .

लहान आर्वी येथे गेल्या एक वर्षापासून मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने सरपंच सुनिल साबळे यांनी नागरीकांच्या तक्रारीप्रमाणे वनविभागाला माकडांचा बंदोबस्त करण्यासाठी ठराव सुध्दा सादर केले आहे. वनविभागाचे वनपाल आणि वनरक्षक यांचे कडून काही नुकसानग्रस्त नागरीकांच्या नुकसानीची पाहणी सुध्दा झाली आहे. परंतु यावर वनविभागाने मात्र काहीही तोडगा काढलेला नाही. त्यामुळे लहान आर्वी येथे वनविभागा बद्दल असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. सौ. रुबीना शाबीर शहॉ यांची आर्थिक परिस्थिती एकदम हलाखीची आहे. त्यामुळे खाजगी दवाखान्यात उपचार करणे कठीण झाले आहे. घटना गावातील असल्याने कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई वनविभागा कडुन देता येत नाही असे वनविभागा कडुन सांगण्यात आले आहे. लहान आर्वी येथील माकडांचा तातडीने बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी लहान आर्वी येथील सरपंच सुनिल साबळे यांनी वनविभागा कडे ठरावासह दिलेल्या निवेदनातून केली आहे.

बेसा पिपळा अंतर्गत नगर पंचायत वर्धापन दिन सोहळ्या निमित्ताने सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन; दोन दिवसीय वर्धापन दिनानिमित्त सोहळ्याचे आयोजन

नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : २२ फेब्रुवारी व २३ फेब्रुवारी या दोन दिवशीय सांस्कृतिक महोत्सवाच्या आयोजन बेसापिपळा नगरपंचायत वर्धापन दिवस यानिमित्ताने सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केलेले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थित होत असून या कार्यक्रमाचे अध्यक्षपदी टेकचंद सावरकर तथा माजी आमदार व नागपूरचे जिल्हाधिकारी बिपिन इटनकर यांची प्रमुख अतिथी पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. बेसा पिपळा नगरपंचायत चे प्रशासक व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजक भारत नंदनवार यांनी केले आहे. शनिवारी लाईव्ह कॉन्सर्ट इंडियन आयडल फेम अबोली गिऱ्हे , अतिश तेलंग हे सुमधुर आवाजाने जनतेला मंत्रमुग्ध करतील. आणि जनतेला भरभरून हसविण्यासाठी धमाल कॉमेडी मराठी चित्रपट सृष्टीतील नामवंत कलाकार चला हवा येऊ द्या फेम श्रेया बुगडे आणि भारत गणेशपुरे यांची उपस्थिती राहतील.

त्याचप्रमाणे २३ फरवरी रविवारी कोण बनेगा डान्स का सुपरस्टार यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील गुन्हे नृत्य कलाकार मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत त्या महिलांचा सांस्कृतिक वेशभूषा परिधान करून फॅशन शोचे आयोजन केले आहे. मराठी /हिंदी सिनेमा सृष्टीतील आवडती अभिनेत्री वर्षाताई उसगावकर यांची उपस्थिती लागणार असून महोत्सवांमध्ये बिग बॉस हिंदी मराठी फिल्म शिव ठाकरे हे प्रामुख्याने उपस्थित राहतील. या कार्यक्रमाची सांगता धमाकेदार आवाजाने गायक चेतन लोखंडे यांच्या नेतृत्वात सायंकाळी ६ ते १० या वाजे दरम्यान बेसा पिपळा चे प्रशासक भारत नंदनवार यांच्या नेतृत्वात महोत्सवाचे समापन होतील.

नागपूर विभागात शिवजयंती निमीत्त 'जय शिवाजी जय भारत पदयात्रा'; विभागीय आयुक्तांनी घेतला आढावा ; नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या जयंती नीमित्त नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये आयोजित होणाऱ्या 'जय शिवाजी जय भारत' पदयात्रेच्या तयारीबाबत आज प्रभारी विभागीय आयुक्त डॉ. माधवी चवरे यांनी आढावा घेतला. जास्तीत जास्त नागरिकांनी या उपक्रामात सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले.

डॉ. चवरे यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत सामान्य प्रशासन विभागाचे अपर आयुक्त प्रदीप कुलकर्णी, क्रीडा व सेवा संचालनालयाचे उपसंचालक शेखर पाटील यांच्यासह दुरदृष्यप्रणालीद्वारे विभागातील सर्व जिल्हाधिकारी उपस्थित होते.

येत्या १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती नीमित्त राज्यात 'जय शिवाजी जय भारत' या अजय भारत पदयात्रेचे आयोजन करण्यात येणार आहे. नागपूर विभागातही या पदयात्रेचे यशस्वी आयोजन होण्याच्या दृष्टीने आजच्या बैठकीत आढावा घेण्यात आला. या पदयात्रेमध्ये नेहरू युवा केंद्र, महानगरपालिका व जिल्हा परिषदेचे शालेय विद्यार्थी, विविध संघटना व संस्थांचे पदाधिकारी सहभागी होणार आहेत. पदयात्रेदरम्यान लेझीम, दानपट्टा, मलखांब आदी मर्दानी खेळांचे सादरीकरण होणार आहे. तसेच रक्तदान शिबीरांचे आयोजनही करण्यात येणार आहे. यासंदर्भात माहिती घेवून डॉ. चवरे यांनी उपस्थितांना आवश्यक सूचना केल्या.

नागपूरात १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० वाजता राजे रघुजी भोसले यांच्या स्मृतीस्थळापासून 'जय शिवाजी जय भारत' पदयात्रा निघणार असून महाल परिसरारतील गांधी गेट येथे समारोप होणार आहे. या पदयात्रेत जिल्हा प्रशासन, महानगरपालिका यांच्यासह विविध संघटना, शाळा, महाविद्यालये, शिवप्रेमी जनता व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

नदी पर्यावरण वाचवण्यासाठी मनशांती ची गरज कृष्णा नदी चळवळीचा लढा पेरणादायी आहे राज योगिनी ब्रह्माकुमारी सुनंदा बहिण जीराज योगिनी ब्रह्माकुमारी सुनंदा बहिण जी

कराड ■ अनिल मोरे



कराड : येथील मसूर प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरी विश्व विद्यालयाचा पंधराव्या वर्धापन दिन निमित्त राजयोगिनी आशीर्वचन ब्रह्माकुमारी सुनंदा दीदी,सबझोन इन्चार्ज मीरा सोसायटी पुणे. यांच्या प्रमुख उपस्थितीत संस्थेचे साधक मान्यवरांच्या समवेत ब्रह्मकुमारी संस्थेच्या हॉलमध्ये मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी आशीर्वचन राजयोगिनी ब्रह्मकुमारी सुनंदा दीदी, पुढे म्हणाल्या राजयोग मेडिटेशनचा नियमित अभ्यास केल्याने वैर,क्रोध,अहंकार,द्वेष, दुर्भावना, नैराश्या, आळस , कंटाळा, न्यूनगंड दूर होतो. तसेच राजयोगाच्या नियमित सरावाद्वारे आत्मा आणि परमात्म्याचा परिचय, होतो. त्यामुळे मनाची एकाग्रता वाढते. मनाला शांती, मिळते. आपले मन योग्य निर्णय, घेते. झोप शांत, लागते. कर्मामध्ये, सुधारना होते. आचरणामध्ये शुद्धता,निर्माण होते. असे अनेक प्रकारचे लाभ, या नियमित राजयोगाच्या सरावाद्वारे मिळतात. यासाठी ब्रह्मकुमारी संस्थेमध्ये विनाशुल्क सात दिवसाचा कोर्स, पूर्ण करावा लागतो. या सात दिवसांमध्ये दररोज फक्त एक तास तुम्ही वेळ द्यायचा असतो. या कोर्समुळे आपल्याला आत्मिक ज्ञान प्राप्त होऊन जीवनाचे खरे सत्याचे दर्शन घडते. असे त्या संस्थेच्या कार्यक्रमा वेळी बोलत होत्या. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार संपन्न झाला यावेळी कृष्णा नदी बचाव चळवळ सक्रिय कार्यकर्ते राहुल पवार यांनी कृष्णा नदी चळवळ देशातील नद्यांची परिस्थिती निसर्गचक्र पर्यावरण सध्या नदीवर सुरू असलेला मानवी हस्तक्षेप बदललेली मानसिकता यासाठी जीवनसृष्टी निसर्गचक्र ऋतुमान चक्र कृष्णेच्या लढ्यात अनेकांचे योगदान साक्षात परमेश्वराचा आशीर्वाद असल्याचा गौरव उद्गार काढले नदी आपली आई आहे तिच्या उद्रेकावरती आघात होत आहे.

आपण ईश्वरी कार्य करत असताना आपल्या आईला वाचवण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले यावेळी कृष्णा नदीची साठी निरंतर लढा देण्याचा निर्धार करण्यात आला गोव्याचे पर्यावरण अभ्यासक राजेंद्र केरकर यांच्या मांडवी नदी नदीचा लढा याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली कृष्णा नदी चळवळ यांनी सुरू केलेले लोकप्रबोधन याविषयीही माहिती देण्यात आली कृष्णा नदीचा प्रबोधन ब्लॉग तयार करण्यात आला आहे प्रबोधन सत्रामध्ये गोव्याच्या लोकसंस्कृती अभ्यासक वनिता शेळके यांच्या त्याचं पूर्वार्धात अस्तित्व होतं जंगल व निसर्गचक्र यांच्या विषयी वाघा विषयी प्रबोधन आर्टिकल याचं लोकांनी कौतुक केले

यावेळी कार्यक्रमाला आशीर्वचन राजयोगिनी ब्रह्मकुमारी सुनंदा दीदी, सबझोन मीरा सोसायटी पुणे. मसूर सेंटरचे मुख्य संतोष भाई,शैलजा बेहन, तसेच मनीषा बहेन, सुजाता बेहन, सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत जिरंगे, नंदकुमार पाटील, पत्रकार गजानन गिरी, अनिल मोरे, कुलदीप मोहिते, राहुल पवार, रूपाली सावंत, गुरव आदी सर्व मान्यवर आणि साधक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

ब्ल्यु डायमंड इंग्लिश मिडिअम शाळेतील विद्यार्थ्यांनी घेतले व्यवहार ज्ञानाचे धडे'

लोणंद ■ मंगेश माने



लोणंद : लोणंद ४ फेब्रुवारी २०२५ रोजी ब्ल्यु डायमंड इंग्लिश मिडिअम स्कूल मधील लहान विद्यार्थ्यांनी स्वतःच्या शेतात पिकवलेला भाजीपाला शाळेत आणून तो विकण्याचे धडे घेतले. जणू आठवड्याचा बाजार भरल्याचे चित्र या चिमुरडयांनी निर्माण केले होते. गावातील महिलांनी आणि पालकांनी आवर्जून येऊन विद्यार्थ्यांनी आणलेल्या वेगवेगळया प्रकारच्या ताज्या पालेभाज्यांची खरेदी केली. शारीरिक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना व्यवहाराचे ज्ञान मिळावे यासाठी प्रत्येक वर्षी बाल बाजाराचे नियोजन शिक्षक व चिमुरडे यांच्यामार्फत केले जाते. इयत्ता नर्सरी ते दहावीचे विद्यार्थी या बाजाराचे नियंत्रण करतात. यामध्ये मुले पालेभाज्या, फळेभाज्या याचबरोबर खाद्यपदार्थ यांचा बाजार भरवतात. या सर्व चिमुरड्यांच्या बाजारातील पालेभाज्या व खाद्यपदार्थांच्या खरेदीसाठी पालक वर्गांनी खूप मोठी गर्दी केली होती. स्कूल मधील बाल बाजाराच्या निमित्ताने प्रमुख अतिथी मा.श्री. सुनिल शेळके सर (सभापती,मार्केट कमिटी लोणंद),श्री. विजयराव धायगुडे (संचालक,कृषी बाजार समिती लोणंद), श्री. शंकरराव मर्दाने (सचिव, ग्राम शिक्षक समिती), सौ. सुचेता हाडबर (राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा अध्यक्षा ,माजी. उपसरपंच अंदोरी),विद्यालयाचे अध्यक्ष मा. श्री जगन्नाथ शेंडगे सर, उपाध्यक्षा सौ. सुरेखा शेंडगे मॅडम, संचालिका मा. सौ. शुभांगी धसाडे मॅडम, मा. मुख्याध्यापिका सौ. हेमलता दीक्षित मॅडम, समन्वयक मा. श्री दत्तात्रय पवार सर व्यवस्थापक मा. श्री अजिंक्य भोसले सर तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते वरील अतिथींनी सर्व बालबाजारात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

अजितदादा ठाकूर यांच्या वाढदिवसा निमित्त कामगार नेते महेंद्र घरत यांनी दिल्या शुभेच्छा

दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी ■ विठ्ठल ममताबादे



उरण : उरण तालुक्यातील भेंडखळ गावाचे ग्रामपंचायत सदस्य अजित दादा ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र शेठ घरत यांनी अजितदादा ठाकूर यांनी आजपर्यंत केलेल्या सर्व कामांचे कौतुक करत वाढदिवसाच्या शुभेच्छा देत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.तसेच भेंडखळ काँग्रेस ऑफिस येथे भेंडखळ गावातील काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते,भेंडखळ ग्रामस्थ,अजित दादांचा मित्रपरिवार यांच्या उपस्थितीत अजित दादा ठाकूर यांचा वाढदिवस मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.अजितदादा ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने विविध सामाजिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते.अजितदादा ठाकूर यांनी आजपर्यंत अनेक विकासकामे केल्याने व जनतेची समस्या सोडविण्यासाठी नेहमी अग्रेसर असल्यामुळे त्यांना सर्वच राजकीय पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते यांच्यासह व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टग्राम आदी सोशल मीडियाच्या माध्यमातूनही वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आले आहेत.

श्री स भु प्रशाला गोंदेगांव ची चैताली वाघ NMMS परीक्षा उत्तीर्ण



दै, जनप्रभात सोयगाव प्रतिनिधी ■ भावराव मोरे

सोयगाव : इयत्ता ८ वी क ची विद्यार्थिनी कु. वाघ चैताली सुनिल ही श्रेष्ठ परीक्षेत उत्तीर्ण झालेली आहे. या परीक्षेस प्रशालेतील एकूण १७ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ही एकमेव विद्यार्थिनी उत्तीर्ण झालेली आहे.

तिने मिळविलेल्या या यशाबद्दल प्रशालेचे शालेय समिती अध्यक्ष डॉ. योगेश इंगळे आणि सर्व शालेय समिती सदस्य व मुख्याध्यापक आर.एस.माळी यांच्या हस्ते चैताली व तिच्या आई वडिलांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रशालेचे उपमुख्याध्यापक एस.आर. दाभाडे, पर्यवेक्षक जी.जी. ढाकणे, श्रेष्ठ विभागप्रमुख एस.व्ही. खिरे, सहाय्यक एम.बी.पाटील, एम.एन.पाटील, आशा पाटील, ए.व्ही.पिंगळे,ए.के.देसले,एस.बी .पाटील, प्रशांत देशमुख, अशोक जोशी, ज्ञानेश्वर मासरे, अजय बिंदवाल यांची उपस्थिती होती.यांच्यासह समस्त शिक्षक शिक्षकेतर सहकारी, पालक व विद्यार्थी आदींनी तिचे अभिनंदन केले.

हिंदुस्तान फीड्स प्रा. लि.कंपनीकडून शालेय विद्यार्थ्यांना वह्या वाटप

शिरुर ■ प्रतिनिधी



महाराष्ट्रामध्ये जनावरांच्या खाद्यासाठी प्रसिद्ध असणारी हिंदुस्तान फीड्स या कंपनीकडून अनेक शाळांना शैक्षणिक साहित्य पुरविले जाते.

कंपनीच्या सीएसआर फंडातून नुकतेच जि. प. प्राथमिक शाळा कान्हूर मेसाईच्या इयत्ता पहिली ते चौथीतील एकूण ११९ विद्यार्थ्यांना सुमारे चारशे वह्यांचे वाटप या कंपनीकडून करण्यात आले.

यावेळी कंपनीचे सेल्स मॅनेजर नवनाथ राक्षे, कंपनीचे मार्केटिंग ऑफिसर मच्छिंद्र महाजन तसेच गावच्या सरपंच सौ राजश्रीताई रुपनेर, शहाजी दळवी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष योगेश पुंडे, मा.अध्यक्ष संतोष ननवरे, संचालक अनिल चौधरी, मा संचालक मच्छिंद्र माळवदे, संचालक विठ्ठल उकिर्डे, मुख्याध्यापक किसन हरपुडे, शिक्षक किरण नरवडे, शिक्षिका लता पुंडे, पल्लवी गायकवाड उपस्थित होते.

याप्रसंगी शहाजी दळवी यांनी हिंदुस्तान फीड्स कंपनीच्या या समाजोपयोगी उपक्रमाबाबत आपल्या मनोगतातून कौतुक केले. साधारणपणे जनावरांना खाद्य पुरवणे आणि नफा कमावणे एवढेच न ठेवता हीं कंपनी महाराष्ट्रातील बहुतांशी शाळांना शिक्षण उपयोगी साहित्य पुरवण्याचे काम करत आली आहे.

हिंदुस्तान फीड्स कंपनीच्या मान्यवरांचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. मान्यवरांच्या शुभहस्ते मुलांना वह्या वाटप करण्यात आले. हिंदुस्तान फीड्स कंपनीचे शाळा, शाळा व्यवस्थापन, विद्यार्थी,शिक्षक व पालकांच्या वतीने आभार व्यक्त केले.

तळेगाव - न्हावरे महामार्ग सिमेंट काँक्रिटीकरणचे काम निकृष्ट दर्जाचे ; संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे; उरळगाव ग्रामस्थांची मागणी

वाघोली (पुणे) ■ स्वरुप गिरमकर



(पुणे) वाघोली : राज्य महामार्ग आणि उच्च वाहतूक असलेल्या ग्रामीण रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्यावर शासनाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. या रस्त्यांचा विकास आर्थिक वृद्धी आणि जलद वाहतुकीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.याच माध्यमातून निखिल कन्ट्रक्शन ग्रुपच्या कंपनीकडून तळेगाव न्हावरे रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरणाचे काम सुरू आहे. मात्र अत्यंत निकृष्ट दर्जाची कामे काही ठिकाणी सुरु असून यावर कोणाही अधिकाऱ्याचे लक्ष नसल्याचे दिसून येत आहे.उरळगाव हद्दीतील मार्गाचे काम पाहता याची प्रचिती येत आहे. या कामामुळे प्रभागातील रहिवासी संताप व्यक्त करत आहेत.ग्रामीण भागाच्या विकासाच्या दृष्टीने हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा असून, या रस्त्याचे काम चांगल्या पद्धतीने व लोकांच्या सोयीचे होणे गरजेचे आहे. परंतु अनेक ठिकाणी चुकीच्या पद्धतीने व निकृष्ट दर्जाचे काम सुरु आहे.रस्त्याच्या कामात ठेकेदाराकडून योग्य साहित्य वापरले जात नाही.

रोडच्या सबग्रेडच्या कामासाठी खडी टाईप कडक मुरूम न वापरता त्याऐवजी माती युक्त डस्ट वापरली जात आहे. मातीचा आणि मोठ्या दगडांचा सर्रास वापर केला जात आहे आणि पाण्याचा वापर न करता तसेच रोलिंग केले जात असल्याचे उरळगावचे सोसायटीचे चेअरमन संतोष सात्रस, सामाजिक कार्यकर्ते शशिकांत कोकडे, ग्रामस्थांनी सांगितले.

'जनतेचा पैसा वाया जातो आहे आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना त्याचे काहीच सोयरसुतक नाही. हा रस्ता केवळ ठेकेदाराला पोसण्यासाठी तयार करण्यात येत आहे का?असा सवाल उरळगाव ग्रामस्थांनी केला आहे.त्यामुळे संबंधित विभागांनी तात्काळ ठेकेदारास रस्त्याच्या कामातील त्रुटी, दोष दूर करून दर्जात्मक काम करण्याच्या सूचना द्याव्यात अशी मागणी या वेळी चेअरमन संतोष सात्रस,सामाजिक कार्यकर्ते शशिकांत कोकडे, ग्रामपंचायत सदस्य स्वप्नील गिरमकर, मा. तंटामुक्ती अध्यक्ष शिवाजी सात्रस,निलेश सात्रस,बाळासाहेब कोकाटे, बाबजी गिरमकर,ऋषी बांडे, नामदेव सावंत, साहेबराव डाळिंबकर,राजेंद्र जांभळकर, निलेश पोपळघट,दादाभाऊ सात्रस,ग्रामस्थांकडून करण्यात आली.

फौजदारी गुन्ह्यात दोषी व्यक्ती नोकरीस अयोग्य, तर मग मंत्री कसा बनतो ?; सुप्रीम कोर्टाचा खडा सवाल

परभणी ■ दत्तात्रय कराळे



परभणी : एका याचिकेवर सोमवारी झालेल्या सुनावणीदरम्यान सुप्रीम कोर्टाने उघडपणे नाराजी व्यक्त केली. 'राजकारणातील गुन्हेगारीकरण' या मुद्यावर सुप्रीम कोर्टाने सोमवारी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. हा गंभीर मुद्दा असल्याचे सांगत कोर्टाने निवडणूक आयोगालाही यावर ठोस उपाय शोधण्याचे निर्देश दिले आहेत. फौजदारी गुन्हात दोषी ठरवल्यानंतरही एखादी व्यक्ती संसदेत कशी येऊ शकते, असा सवालही कोर्टाने केला आहे.

सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश दीपांकर दत्ता आणि न्यायाधीश मनमोहन यांच्या खंडपीठासमोर सोमवारी एका जनहित याचिकेवर सुनावनी झाली. अश्विनी उपाध्याय यांनीही याचिका दाखल केली असून त्यामध्ये खासदार आणि आमदारांविरोधातील फौजदारी खटले तातडीने निकाली निघावेत आणि दोषी नेत्यांवर निवडणूक लढवण्यावर आजीवन बंदी घालण्याची मागणी करण्यात आली आहे.

याचिकेमध्ये लोकप्रतिनिधी कायद्यातील कलम ८ आणि ९ च्या घटनात्मक वैधतेलाही आव्हान देण्यात आले आहे. कोर्टाने त्यावर केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाकडून तीन आठवड्यांत भूमिका स्पष्ट करण्यास सांगितले आहे. कोर्टाने म्हटले आहे की, एखाद्याला दोषी ठरवल्यानंतर संबंधित व्यक्ती संसदेत किंवा विधीमंडळात कसे येऊ शकतात? याचे उत्तर द्यावे लागेल.

जर एखादा सरकारी कर्मचारी भ्रष्टाचार किंवा राज्याविरोधातील कारवायांसह दोषी आढळतो, तेव्हा त्याला नोकरी करण्यास अपात्र ठरवले जाते. पण तो मंत्री बनू शकतो, असे का?, असा सवाल कोर्टाने उपस्थित केला आहे. कोर्टाच्या भूमिकेमुळे 'राजकारणातील गुन्हेगारीकरण' हा मुद्दा पुन्हा ऐरणीवर येण्याची शक्यता आहे. अनेक बड्या राजकीय नेत्यांवर सध्या फौजदारी खटले सुरू असून यापूर्वी अनेकांना गंभीर गुन्ह्यात शिक्षाही झाली आहे.

सुप्रीम कोर्टाने म्हटले की, 'एका पूर्ण पीठाने (तीन न्यायाधीश) खासदारांविरोधातील फौजदारी खटले तातडीने निकाली निघावेत, यावर निकाल दिला होता. त्यामुळे खंडपीठाद्वारे (दोन न्यायाधीश) या प्रकरणावर पुन्हा सुनावणी घेणे, योग्य ठरणार नाही.' सुप्रीम कोर्टाने या मुद्याला पूर्ण पीठासमोर विचारार्थ मांडण्यासाठी मुख्य न्यायाधीश संजीव खन्ना यांच्यासमोर ठेवण्याचे निर्देश दिले. एकूणच काय तर या प्रकरणी देशभरांतील उच्च नायालये आणि सर्वोच्च न्यायालयाने खरोखरच मनावर घेऊन या प्रकरणी योग्य असा निर्णय दिला तर मात्र गुन्हेगारीत जखडलेल्या हजारोच नव्हे तर लाखो राजकीय पुढाऱ्यांची गोची होऊ शकेल एवढे निश्चित..!

बारभाई सावळी सदोबा रस्त्याचा काम चालू करण्याचा मुहूर्त कधी मिळणार

आर्णी ■ धनराज पवार



सावळी सदोबा ते बारभाई तीन किलोमीटर अंतर्गत निकृष्ट दर्जाचा रस्ता सदर रस्त्याच्या कामाला मंजुरात मिळाली परंतु ठेकेदार काम चालू करण्याचा मुहूर्त कधी काढणार आपल्या मनमानी कारभारामुळे रस्त्याच्या कामाला सुरुवात करायला तयार नसल्याचे दिसून येतात ते काम करण्याच्या मनस्थिती नसल्याचे या वरून दिसून येते या रस्त्याचे काम ज्या विभागाकडे करून घेण्याची जबाबदारी आहे त्या संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी त्वरित या रस्त्याचे काम करणारे ठेकेदार यांचा परवाना रद्द करून या रस्त्याचे काम इतर ठेकेदाराकडे वर्ग करण्यात यावे जेणेकरून रस्त्याचा कामाला ताबडतोब सुरुवात होईल व गावकऱ्यांना सुटकेचा स्वास घेता येईल अशी मागणी गावकऱ्यांकडून करण्यात येत आहे या निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांमुळे दैनंदिन अपघात घडत असून येणाऱ्या जाणाऱ्या पदचारांना व वाहन चालकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे .त्यामुळे संबंधित विभागाने या विषयाची तातडीने दखल घेऊन या रस्त्याच्या कामाला ताबडतोब सुरुवात करावे व दिवसेंदिवस होणारा दुर्घटना टाळावे अशी मागणी गावकऱ्यांकडून करण्यात येत आहे खेड्या गावात शेतकरी शेती करतात व आपला विक्री करता बाजारपेठेत नवा लागतो बाजार नेण्यासाठी चांगले रस्त्याची गरज असते व आरोग्य सेवा मिळण्यासाठी, विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय मिळण्यासाठी दळणवळणाची आवश्यकता असते व ते दळणवळण वाहनाद्वारे जाऊ शकते पण रस्त्याची दुरुस्त असल्यामुळे वाहन चालक वाहन नेण्यासाठी टाळाटाळ होते ही सुविधा मिळावी म्हणून गावकऱ्यांनी या रस्त्याची लवकरात लवकर बनवून मिळावी अशी मागणी करत आहे...

बांधकाम विभागाची प्रतिक्रिया

सदर या रस्त्याविषयी बांधकाम उपअभियंता यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी ठेकेदाराविषयी खंत व्यक्त केली व काम सुरू करण्याकरिता ठेकेदाराला तसे पत्र पाठवले आहे ते एका आठवड्यात कामाला सुरुवात करत नसेल तर दुसऱ्या ठेकेदाराकडे काम वर्ग करण्यात येईल असे त्यांनी दैनिक पब्लिक पोस्ट प्रतिनिधी आकाश राठोड सावळी सदोबा यांच्याशी बोलताना सांगितले...

उरण तालुका केमिस्ट असोसिएशनच्या वतीने औषध निर्मातेसाठी प्रशिक्षण

दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी ■ विठ्ठल ममताबादे



उरण : महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य औषधी व्यवसाय परिषदेच्या (एम एस पी सी) औषधे माहिती केंद्राच्या (डी आय सी) केमिस्ट हृदय सम्राट आप्पासाहेब शिंदे यांच्या संकल्पनेतून साकारलेले 'निरंतर शिक्षण प्रणाली 'अंतर्गत औषधे निर्मात्यांना प्रशिक्षण देणे सुरू करण्यात आले आहे.त्या अंतर्गत उरण तालुक्यातील औषधे निर्माते(फार्मसिस्ट)साठी प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम उरण तालुका केमिस्ट असोसिएशनचे वतीने हॉटेल आनंदी भोईर बेंक्विट हॉल उरण येथे आयोजित करण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्य औषध परिषदचे अध्यक्ष अतुल अहिरे आणि औषध माहिती केंद्राचे प्रमुख गणेश बांगले आणि त्यांच्या टीमने एकाच दिवशी ३६ जिल्ह्यात ४४ ठिकाणी हा कार्यक्रम घेण्याचा विक्रम महाराष्ट्र राज्य औषध परिषदेने केला आहे. त्याच अंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम 'फार्मसी मॅनेजमेंट कोर्स' उरण येथे आयोजित आला.

महाराष्ट्र राज्य औषध परिषद सदस्य नितीन मणियार आणि रायगड जिल्हा केमिस्ट अँड डिस्ट्रीब्युटर्स संघटनेचे अध्यक्ष लीलाधर पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते

औषधे निरीक्षक हेमंत आढे यांनी औषध निर्मातांसाठी प्रशिक्षण कोर्स आयोजित करत असल्याने महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिल आणि संघटनेचे कौतुक करून या प्रशिक्षणाचा फायदा घेऊन सर्व औषध निर्माता बंधू भगिनीनी रुग्ण सेवा द्यावी असे सांगितले. ज्येष्ठ फार्मासिस्ट शशांक म्हात्रे यांनी व्यवसाय संबंधी मार्गदर्शन केले. पूजा निकम यांनी सर्व औषध निर्माता बंधू-भगिनींना उत्तम प्रशिक्षण दिले. या कार्यक्रमासाठी रायगड जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे सदस्य विकास नाईक ,सुधीर काटले, विवेक शिंदे , नितीन गावंड, सचिन सितापराव, संजय धनासुरे, कोर्स कॉर्डिनेटर संतोष घोडींदे उपस्थित होते.उरण तालुक्यातील ४५ औषध निर्माता बंधूनी या प्रशिक्षणाचा फायदा करून घेतला. रायगड जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष लीलाधर पाटील सचिव प्रवीण नावंदर यांच्या मार्गदर्शनाखाली, रायगड जिल्हा संघटनेचे पदाधिकारी मनोज ठाकूर,उरण तालुका संघटनेचे अध्यक्ष उमाकांत पानसरे, सचिव राजेश्वर गावंड, सदस्य बाळू घालवट, जयश्री महाजन, सुवर्णा बोराडे यांनी विशेष मेहनत घेतली.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक,मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर,नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय,नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक,मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242